☸️☸️☸️🦚🦚🦚 हि पोस्ट मला आवडली मनून पोस्ट करत आहे बघा वाचून! जय भीम नमोबुध्दाय 🙏🌹

हिंदू आणि सत्ता

""""""""""""""""""""""""""""

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला भारतावर हिंदूंची सत्ता पाहिजे सत्ता म्हणजेच ब्राहमणांची सत्ता पाहिजे, त्यानुसार भारतावर हिंदूंची म्हणजेच ब्राहमणांची सत्ता स्थापन झाली. तरी पण राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यावर समाधानी नाही कारण त्याला त्याचे मनसुबे राबवताना राज्यघटनेची अडचण येत आहे राज्यघटना सर्वसामान्य हिंदूंच्या हिताची आहे पण उच्चवर्णीय हिंदू ब्राहमणांच्या अडचणीची आहे शक्यतो म्हणून इथला सर्वसामान्य नागरिकांनी हिंदू म्हणजे काय हे समजून घेतले पाहिजे.

भारतातला हिंदू मुख्यत्वे दोन भागात विभागल्या गेलेला आहे. एक सवर्णहिंदू आणि दुसरा अवर्णहिंदू सवर्ण म्हणजे 15 टक्के उच्चवर्णीय हिंदू आणि अवर्ण म्हणजे 85 टक्के मागासवर्गीय हिंदू.

यांच्या मतानुसार ब्राहमण, क्षत्रिय आणि वैश्य हे सवर्ण हिंदू आहेत आणि त्यांच्या व्यतिरिक्त इतर सर्व हे अवर्ण हींदु आहेत या अवर्णांना आपण इथे मागासवर्गीय म्हणू.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, बीजेपी, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल आणि त्यांची पिलावळ ही सर्व उच्चवर्णीय हिंदू हितासाठी काम करीत असते, या उच्चवर्णीय हिंदूचे भारतात आणि भारताबाहेर सर्व क्षेत्रात वर्चस्व असावे हे यांचे ध्येय आहे आणि हेच म्हणजे त्यांचे हिंदूराष्ट्र आहे.

हे सगळ्या उच्चवर्णीय हिंदूंना मंजूर आहे हिच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची म्हणजे ब्राहमणांची विचारधारा आहे उच्च वर्णियातही यांना ते उच्चवर्णीय हिंदू म्हणून मान्य नाहीत जे ब्राहमणी तत्त्वज्ञानाला विरोध करतात.

भारतीय राज्यघटना ही ब्राहमणी तत्वज्ञानाला म्हणजेच विषमता वादाला नकार देते म्हणून यांना भारतीय राज्यघटना मंजूर नाही, मान्य नाही राष्ट्रीय स्वयंसेवक संघवाले रात्रंदिवस हिंदू आणि हिंदुत्वाचा जाप करीत असतात व त्यांचे श्रेष्ठत्व टिकविण्याची वेळ आली तर कट्टर हिंदू असलेले मी. गांधी यांचा खून करतात, तसेच साम्यवादी विचारधारेने प्रभावित असलेले हिंदू कलबुर्गी, पानसरे, दाभोळकर आणि गौरी लंकेश यांचाही खून करतात, खुनाचे जाहीर सर्थन करतात. त्यांचे हे कार्यें आज नवीन नाही. यापुर्वीच्या इतिहासात त्यांनी हे श्रेष्ठत्व टिकविण्यासाठी हत्याच केल्या आणि भविष्यातही हे हत्याच करणार आहेत. याचे कारण म्हणजे ब्राम्हणांना त्यांचा तथाकथित हिंदू धर्म महत्वाचा नाही तर त्यांच्या ब्राम्हण जातीचे श्रेष्ठत्व आणि स्वार्थ हा महत्वाचा आहे. त्यांचे सर्व हिंदू समाजावर असलेले वर्चस्व महत्वाचे आहे.

मध्यप्रदेशात काँग्रेस हिंदूंचे सरकार होते ते त्यांनी पाडून बीजेपीचे हिंदूंचे सरकार आणले हिमाचल प्रदेशात काँग्रेस हिंदूंचे सरकार होते ते सरकार पाडून त्यांनी बीजेपीचे म्हणजेच ब्राम्हण हिंदूंचे सरकार आणले महाराष्ट्रात शिवसेना, काँग्रेस हिंदूंचे सरकार होते पण ते पाडून त्यांनी ब्राम्हण हिंदूंचे म्हणजेच बीजेपीचे सरकार आणले आणि प्रत्येक ठिकाणी ते हेच करित आहेत हे सगळं राष्ट्रीय स्वयंसेवक संघ अगदी खुळेपणाने करित आहेत त्यांना कोणत्याही प्रकारची भीती नाही आडकाठी नाही जे करतांना त्यांची जी व्यूहरचना आहे ती व्यूहरचना आपण समजून घेतली पाहिजे. कारण एखाद्या संघटनेची व्युहरचना जेव्हा तुम्ही समजून घ्याल तेव्हाच तुम्ही त्या संघटनेला पराभूत करू शकाल अन्यथा नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा वर्णव्यवस्थेवर घट्ट विश्वास आहे आणि ही वर्णव्यवस्था राष्ट्रीय स्वयंसेवक संघातही हिंदू ब्राम्हण स्वयंसेवकाला सर्वात वरती ठेवत असते, हिंदू मागासवर्गीय स्वयंसेवकाला खाली ठेवत असते.

आज या देशातील शासनकर्ती जमात ही ब्राम्हणवर्ग आहे आणि ती का आहे तर त्याला कारणीभूत या देशातली वर्णव्यवस्था आहे ती जरी दिसत नसली तरी ती पूर्णपणे सक्रिय आहे, आंतरजतीय विवाहाने सुद्धा ती मोडत नाही तर आंतरजतीय विवाह करणाऱ्याला ती जातींनुसार आपल्यात सामावून घेते नाहीतर शूद्रत्वात ढकलून देते. ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र अशी ही ब्राम्हणी समाजाव्यवस्था ब्राम्हण वर्गाला सतत संरक्षण देत असते. यांना संरक्षण देणारे मागासवर्गीय हिंदूच असतात ही यांची चक्रव्युह रचणा आहे.

या देशाच्या इतिहासात आणि वर्तमानात जेव्हा जेव्हा रक्तरंजित धार्मिक संघर्ष झाले तेव्हा तेव्हा या देशात सर्वसामान्य हिंदू मुस्लिम मारल्या गेले पण ब्राम्हण मात्र सदैव सुरक्षित राहिला या चातुर्वर्ण्यसमाज व्युहरचनेने ब्राम्हण वर्गाला नेहमीसाठी सुरक्षित ठेवलेले आहे. अफजलखानाचा शिवाजीच्या हाताने सहज मूडदा पडला पण शिवाजीवर वार करणारा ब्राम्हण कृष्णाजी भास्कर कुलकर्णी हा सुरक्षित राहिला, या चातुर्वर्ण्यव्यवस्थेमुळे ब्राम्हणावर कधीच आघात झालेले नाहीत. या देशात युद्ध झालेत पण पण ब्राम्हणवर्ग सदैव सुरक्षित राहिला कारण चातुर्वर्ण्यसमाजात ब्राम्हणवर्गाला असलेले सर्वोच्य स्थान होय.

भारतीय समाजिक आणि धार्मिक क्षेत्रात कार्य करीत असतांना प्रत्यक्ष निर्णय घेणारे, निर्णय राबविणारे आणि प्रत्यक्ष कृती करणारे व्यक्ती हे वेगवेगळ्या जातीचे असतात म्हणून चुकीचा निर्णय राबवितांना कितीही प्राणहाणी झाली तरी निर्णय घेणाऱ्यांना त्यांना पर्वा नसते. कारण निर्णयाचे विपरीत परिणाम निर्णय घेणाऱ्याच्या जातीवर होत नाहीत तर निर्णय राबविणाऱ्या व प्रत्यक्ष कृती करणाऱ्याच्या जातीवर, समाजावर होत असतात.

या देशाच्या फाळणीमध्ये हेच घडले राज्यकर्त्या उच्चवर्णीय मुसलमानांना त्यांचे राज्य पाहिजे होते आणि हिंदू उच्चवर्णीय ब्राम्हणांना त्यांचे राज्य पाहिजे होते म्हणून द्विराष्ट्र संकल्पनेला जबरदस्त वैचारिक खतपाणी मिळाले, अखंड भारत ठेवण्यासाठी तडजोड झाली नाही व शेवटी या अखंड भारताचे दोन तुकडे झाले हे इथे विसरता कामा नये. आजही भारतात ज्या ठिकाणी धार्मिक दंगली होतात किंवा पेटवल्या जातात त्या-त्या भागात जीवहानी, वित्तहानी ही

मागासवर्गीय मुसालमान आणि मागासवर्गीय हिंदूंची होते म्हणून धार्मिक दंगली पेटत असतात, पेटवल्या जात असतात. ज्या दिवसी या दंगलीत ब्राम्हण आणि उच्चवर्णीय मरतील त्या दिवसी या धार्मिक दंगली पेटणे आपोआप पूर्णतः बंद होतील हे नक्की.

भारताला स्वातंत्र्य मिळून आज जळजवळ ७५ वर्षे झाली पण भारताच्या सर्वसामान्य नागरिकांची सामाजिक समतेत व आर्थिक समतेची असिकाही विशेष प्रगती झाली नाही. पण उच्चवर्णीय वर्गाची मात्र चांगली प्रगती झाली आहे. भारतातल्या हिंदू समाजात जो उच्चवर्णीय घाटक ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आहे त्या घटकाचा विकास झालेला आहे पण आज हिंदू समाज व्यवस्थेनुसार जो शूद्रवर्ग आहे तो जिथल्या तिथेच आहे उलट मागे गेलेला आहे.

१०% उच्चवर्णीय हिंदुकडे भारतातील ८०% संपत्ती गेलेली आहे. भारतातला खरा संघर्ष हा शूद्र हिंदू विरुद्ध उच्चवर्णीय हिंदू असाच आहे भारतातील बहुतेक राजकीय पक्ष उच्चवर्णियांनी हिंदूंनी स्थापन केलेले राजकीय पक्ष आहेत त्यात शूद्रवर्णीय लोक हे कामगार म्हणजेच कार्यकर्ते आहेत ज्याप्रमाने एखाद्या कारखान्यात जोखमीचे काम करताना मृत्यू झाला तर तो कामगाराचा होतो कारखान्याच्या मालकाचा व अधिकाऱ्यांचा होत नाही त्याचप्रमाने राजकीय व धार्मिक दंगली झाल्या तर कामगार कार्यकर्ते मरतात पक्ष संस्थापक व पदाधिकारी सुरक्षित राहतात तसेच हिंदू समाज व्यवस्थेचे आहे इथे हिंदू मुस्लिम दंगली झाल्या तरी उच्चवर्णीय हिंदू मरत नाही म्हणून भारतात कोणत्या ना कोणत्या कारणाने दंगली होत असतात.

हिंदू हा धर्म नाही तर ती एक समाज व्यवस्था आहे हिंदू हा धर्म असता तर आज या धर्माचा एक संस्थापक असता एक ईश्वर असता व सर्व हिंदूंची पूजा पद्धत समान असती सर्व हिंदूंना पुजारी बनायचा अधिकार असता, हिंदूं धर्मात पुजारी किंवा पुरोहित हा सर्वश्रेष्ठ आहे आणि तो फक्त ब्राम्हणच होऊ शकतो म्हणून हा हिंदूधर्म नाही तर ब्राम्हण धर्म आहे. एक ब्राम्हणी समाजव्यवस्था आहे कारण येथे पुरोहित बनायचा अधिकार हा फक्त ब्राम्हणांना आहे. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात ब्राम्हण धर्माचे नामांतर होऊन तो हिंदू धर्म झालेला आहे ब्राम्हण धर्माचे नाव बदलून त्याला २० व्या शतकाच्या पुर्वार्धात हिंदूधर्म म्हणून मान्यता देण्यात आली, ही इथे लक्षात घेण्यासारखी बाब आहे.

ज्याप्रमाने सरकारी यंत्रणेत आणि शासकीय कार्यालयात कार्यालायाचे कामकाज सुरळीतपणे व सक्षमतेने चालावे म्हणून क्लास वन, क्लास टू, क्लास थ्री दर्जाचे अधिकारी आणि क्लास फोर दर्जाचे कर्मचारी असतात. त्याचप्रमाणे हिंदू समाजातही ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य दर्जाचे अधिकारी आणि शूद्र दर्जाचे कर्मचारी आहेत सरकारी कार्यालयात आपल्या योग्यतेने आपल्याला क्लास वन अधिकारी बनता येते पण हिंदू समाज व्यवस्थेत ती सोय नाही. या प्रशासन व्यवस्थेत कोणताही निर्णय राबविताना जसे क्लास वन अधिकारी सुरक्षित राहतात आणि क्लास फोर दर्जाचे पोलीस मरतात तसेच या विषम समाजव्यवस्थेत धार्मिक दंगली उसळल्या तरी ब्राम्हण सुरक्षित राहतात त्यांना कोणत्याही प्रकारची जीवितहानी वित्तहानी होत नाही. जीवितहानी वित्तहानी झाली तरी ती शूद्र हिंदूंची होते ब्राम्हण धार्मिक दंगलीची पर्वा करीत नाही ही वास्तविकता आहे.

हिंदीत एक म्हण आहे जान है तो जहान है या म्हणीप्रमाणे जीव आहे म्हणून जग आहे हे वास्तव आहे. भारतातल्या आजपर्यांच्या राजकीय, सामाजिक आणि धार्मिक उलथापालथीमध्ये इथल्या शूद्राची वाट लागली परकीय आक्रमनामध्ये आणि युद्धात क्षत्रियांची आणि बनियांची वाट लागली पण ब्राम्हण कालही सुरक्षित राहिले आणि आजही सुरक्षित आहेत याचे कारण वर्णव्यवस्थेवर आधारित ब्राम्हणधर्म आहे ज्याला २० व्या शतकापासून ब्राम्हण हिंदू धर्म म्हणून संबोधतात हा धर्म ब्राम्हणांना जागेवर प्रतिष्ठा, पद आणि पैसा मिळवून देतो म्हणून हे रात्रंदिवस या धर्माचे समर्थन करित असतात त्यांचा उदो उदो करीत असतात मुळात ब्राम्हणधर्म पण नामांतरित हिंदूधर्म ब्राम्हणांना सदैव सुरक्षित ठेवतो म्हणून हे हिंदू हिंदुत्व हिंदुराष्ट्र याचे रात्रंदिवस समर्थन करतात हिंदू धर्म हा इथल्या ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्यासाठी एक वरदान आहे तर इथल्या शूद्रांसाठी एक अभिषाप आहे हे इथल्या शूद्र भारतीयांनी म्हणजेच ओबीसींनी समजून घेतले पाहिजे.

ज्याप्रमाने चिखलात राहून चिखलसाफ करता येत नाही. त्याचप्रमाने हिंदू धर्मात राहून हिंदू धर्मात सुधार करता येत नाही आणि येणारही नाही त्याबर धर्मांतर हा एकमेव उपाय आहे पण त्यातही जो धर्म पुरोहितगिरीला आणि ईश्वरवादाला मान्यता देतो तो धर्म ब्राम्हणवदावर उपाय होऊ शकत नाही कारण ब्राम्हण नविन धर्मात प्रवेश करतात. आणि तिथेही मौलाना आणि फादरचे स्थान बळकावून आपले हित साध्य करतात म्हणून ज्या धर्माचा पाया विज्ञानवादावर आणि मानवतावादावर आहे तोच धर्म ब्राम्हणवाद्यांना पराभूत करू शकतो इतर धर्म पराभूत करूच शकत नाही शेवटी धर्माचे उत्तर धर्माणेच द्यावे लागेल एखादा धर्म जर आपल्या अधोगतीला कारणीभूत ठरत असेल तर तो धर्म फेकून देणे बदलणे हाच त्यावर एकमेव योग्य उपाय राहील.

प्रमोद मून. २६/०१/२०२३.

☸️☸️🦚🦚🦚*अद्वितीय शिष्य आनंद; बौद्ध इतिहासात आनंदाचे योगदान जाणून घ्या!*🦚🦚🦚☸️☸️

या जगात असंख्य गुरू होऊन गेले पण भगवान बुद्धांसारखे गुरु या जगात झालेले नाहीत. तसेच अनेक गुरूंचे अनेक शिष्य होऊन गेले परंतु आनंद सारखा बुद्धांचा शिष्य या जगामध्ये झालेला नाही. बौद्ध इतिहासात आनंदाचे योगदान अद्वितीय आहे. तो होता म्हणून पहिली धर्मसंगिती यशस्वी झाली आणि बुद्धवचने सुरक्षित झाली. तो होता म्हणून स्त्रियांना संघात प्रवेश मिळाला. तो होता म्हणून भगवान बुद्ध यांचा सहाय्यक झाला आणि उतारवयात त्यांची काळजी घेतली.

आनंद हा बुद्धांचा चुलत भाऊ. जेव्हा सिद्धार्थ गौतम बुद्ध झाले आणि ते पहिल्यांदा कपिलवस्तुला आले, तेव्हा आनंदने त्यांना पाहिले. त्यांचा उपदेश ऐकला आणि तो त्यांचा निस्सीम शिष्य झाला. भगवान बुद्ध जेंव्हा ५५ वर्षाचे झाले तेव्हा त्यांना एका सहाय्यकाची गरज भासू लागली. आणि त्यावेळेला शिष्य आनंदाने भगवान बुद्ध यांचा सहाय्यक होण्याचे मान्य केले. आणि आनंद भगवान बुद्धांच्या अखेरच्या

क्षणापर्यंत सोबत राहिला. त्यांचा प्रत्येक शब्द न शब्द, प्रत्येक वाक्य न वाक्य आपल्या स्मरणात ठेवले आणि म्हणून आज आपल्याला बुद्धगाथा शुद्ध स्वरूपात वाचायला मिळत आहेत. त्याकाळी स्त्रियांवर सामाजिक बंधने असताना त्यांना संघात सामील करून घेणेसाठी आनंदने बुद्धांचे मन वळविले. तसेच बुद्धांच्या महापरिनिर्वाणानंतर सैरभैर न होता संघाची धुरा काहीकाळ सांभाळली.

आनंद यांना १२० वर्षांचे आयुष्यमान लाभले. पहिल्या धर्मसंगिती अगोदर अर्हत झाल्यावर स्मरणशक्तीच्या जोरावर ८४००० गाथांना अनुमोदन दिले. बुद्धांचा चालता बोलता इतिहास जगापुढे आणला. आयुष्याच्या अखेरीस मगध राज्यातून वैशालीकडे जाताना गंगा नदीच्या ठिकाणी त्यांचे परिनिर्वाण झाले. नदीच्या दोन्ही बाजुस त्यांचे स्तूप होते, पण गेल्या २००० वर्षांत अनेक वेळा नदीचेपात्र बदलून त्यांचे स्तूपही आपल्यात सामावून घेतले. चिनी प्रवासी भिक्खू फाहियान आणि हुएनस्तंग यांनी त्यांच्या प्रवासवर्णनात वर्णिलेल्या आनंदाच्या स्तुपस्थळांवरून अलीकडेच काही पुरातत्ववेत्यांनी शोध घेतला तेव्हा वैशालिजवळील चेचर गावातील नदीकीनारी भरपूर पुरातन अवशेष आढळले व इथेच आनंदाचे स्तूप असावेत असे मानण्यात आले.

चेचर गावाजवळील नदी: आज या गांवात खाजगी चेचर संग्रहालंय असून असंख्य प्राप्त पुरातन वस्तू तेथे दर्शनार्थ ठेवल्या आहेत. नदीकीनारी नूतनीकरण केलेल्या देवळाच्या गाभाऱ्यात भगवान बुद्ध यांची मूर्ती असून खरे सुखकर्ते आणि दुःखहर्ते म्हणून भक्तीभावाने पुजले जात आहेत. आज आनंद यांचा स्तूप भारतात अस्तित्वात नसला तरी म्यानमार देश आनंद यांना विसरला नाही. या देशात बगान येथे आनंद पॅगोडा हे सर्वात मोठे विहार आहे व दररोज येथे असंख्य भाविक पर्यटक भेट देतात. त्रिपिटकाचा शिल्पकार, उत्कृष्ठ संचालक, उत्तम वक्ता, असलेल्या जगतगुरू बुद्धांच्या या शिष्यास माझे नम्र वंदन.

सभार: धम्मचक्र नेटवर्क.

☸️☸️🦚🦚🦚 *🌈 अंतर्मन... देवदत्त... भगवान बुध्द 🌈* 🦚🦚🦚☸️☸️

देवदत्त हा राजपुत्र सिद्धार्थचा चुलतभाऊ. दोघे एकत्रच लहानाचे मोठे झाले. आपला एकेकाळचा खेळगडी आता गौतम बुद्ध बनलाय, हजारो लोक त्याला सत्पुरुष मानतात, त्याच्या पाया पडतात, हे मोठेपणी देवदत्ताला पटेना. त्याचं मन असूयेने भरून जाऊ लागला. तो बुद्धाला ठार मारण्याचे कट रचू लागला.

एकदा बुद्ध एका डोंगरावर ध्यानस्थ बसलेले असताना देवदत्ताने मागच्या उंचवट्यावरून एक विशाल शिळा ढकलली. तिच्याखाली चिरडून बुद्धाला मारण्याचा त्याचा विचार होता. पण शिळा बुद्धांच्या अगदी शेजारून, चाटून गडगडत खाली गेली.

बुद्धासोबत असलेला भिख्खू बुद्धांना म्हणाला, त्या देवदत्ताने तुमच्यावर शिळा ढकलली. तरी तुम्ही शांत कसे? त्याला धडा शिकवायला हवा.

बुद्ध म्हणाले, अं हं, आता तू मनात त्याच्यावर ढकलण्यासाठी शिळा उभी करू नकोस. त्याच्याजागी तू असतास, तरच त्याची वेदना समजू शकला असतास. त्याने लहानपणी माझ्याशी खेळताना मला कैकदा हरवलंय, पाडलंय, आता मोठेपणी तो ते करू शकणार नाही याचं केवढं वैषम्य त्याच्या मनात दाटलं असेल, याची मला कल्पना आहे.

हे बोलून बुद्ध शांत झाले आणि काही काळ ध्यानस्थ झाले.

बुद्धांचं ध्यान संपल्यावर भिख्खूने विचारलं, तुम्ही अचानक ध्यानस्थ का झाला होतात?

बुद्ध म्हणाले, मी माझं अंतर्मन तपासत होतो. त्यावर देवदत्ताच्या कृतीने काही परिणाम झालाय का, ते पाहात होतो. माझ्याआत काही परिणाम झाला असता, तर त्या शिळेने मला स्पर्शही न करता जखमी केलं हेच सिद्ध झालं असतं आणि देवदत्ताचा हेतू सफल झाला असता. आता मी खात्रीने सांगू शकतो की शिळा मला स्पर्शूनही गेली नाही.

ओशो (ताओ उपनिषद) *संकलनः- सुमंगल तथा रवींद्र अहिरे.*

****

☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 *❀ २७ जानेवारी ❀* 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️

डॉ. सविता भीमराव आंबेडकर जन्मदिन

****

जन्म:- २७ जानेवारी १९०९ (दादर); स्मृती:- २९ मे २००३ (मुंबई).

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आयुष्यभर समाजातील वंचितांच्या हक्कासाठी लढा दिला. पण त्यांचे कौटुंबिक जीवनही फार त्रासदायक होते. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पहिल्या पत्नी रमाबाई आजारपण आणि शारीरिक वृद्धीमुळे मरण पावल्या. त्याआधी बाबासाहेबांनी त्यांची चार मुलेही गमावली होती. या आघातांनी ते पडले होते.

दरम्यानच्या काळामध्ये बाबासाहेबांची प्रकृती देखील खालावत चालली होती. अशातच डॉ. शारदा कबीर यांच्यासोबत बाबासाहेबांची ओळख झाली. आजारपणामुळे बाबासाहेबांना नेहमीच उपचाराकरिता त्यांच्याकडे यावे लागत होते. दरम्यान कालांतराने त्यांनी लग्न करण्याचा निर्णय घेतला. आणि १५ एप्रिल १९४८ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशी रजिस्टर मॅरेज पद्धतीने मोजक्या लोकांच्या उपस्थितीत दोघांचा विवाह पार

पडला आणि शारदा कबीर या सविता आंबेडकर झाल्या. पुढे समाज त्यांना "माईसाहेब" या नावाने ओळखू लागला.

घटना निर्मिती मध्ये माईसाहेबांचा वाटा मोलाचा आहे. बाबासाहेब हे सतत व्यस्त असत. त्यांना आपल्या तब्येतीकडे लक्ष देता येत नसे. परंतु माईसाहेब बाबासाहेबांची पूर्ण काळजी घेत असतं. जर माईसाहेबांनी बाबासाहेबांची योग्य रित्या काळजी घेतली नसती तर कदाचित रमाईच्या मृत्यूनंतरचं बाबासाहेबांनी आपल्या कार्यातून विराम घेतला असता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या 'बुद्ध आणि त्यांचा धम्म' या ग्रंथाच्या प्रस्तावनेत रमाई नंतर पुढे अधिक जगविण्याचे श्रेय त्यांनी सविता आंबेडकर अर्थात माईसाहेब यांना दिले आहे. त्यामुळे रमाई सोबतच माईसाहेब यांचं देखील बाबासाहेब यांच्या जीवन कार्यात महत्वपूर्ण योगदान आहे.

तरीदेखील बाबासाहेबांच्या मृत्युनंतर माईसाहेबांना अपमान व अवहेलनेला समोर जावं लागलं. बाबासाहेबांच्या महापरि निर्वाणानंतर पुढे १९७२ पर्यंत माई दिल्लीतील नेहरोली भागात एकाकी जीवन जगत होत्या. त्यानंतर दलित पँथरच्या चळ वळीने जोर धरला तस राजा ढाले यांनी त्यांना मुंबईत आणलं.

दलित पँथरच्या कार्यकर्त्यांनी माईंचा सन्मान केला. त्यांना आदरान वागवलं. शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या मै प्रबळ होत्या. पुढे दलित पँथर तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या सदस्य व कार्यकर्त्यांच्या आग्रहाणे माईसाहेब दलित चळवळीच्या मुख्य प्रवाहात येऊ लागल्या होत्या. 'रिडल्स इन हिंदुझम' च्या आंदोलनात त्यांनी महत्वाची भूमिका घेतली होती.

माईसाहेब या अतिशय हुशार व संवेदनशील होत्या. त्यांचं इंग्रजीवरही प्रभुत्व होत. हे त्यांनी बाबासाहेबांच्या सहवासात कमावलं होत. माईंनी 'डॉ. आंबेडकरांच्या सहवासात' हे बाबासाहेबांवर आधारित चरित्रपर पुस्तक लिहिले होते. त्यामध्ये त्यांनी बाबासाहेबांच्या प्रती असलेली प्रेमानुभूतीच वर्णन केलेलं आहे. त्याशिवाय हिंदू कोडबिलांच्या मसुद्याकरिता आवश्यक टिपण आणि पाली शब्दकोशाकरिताही केलेली मदत अशा अनेक बाबी त्यांनी त्यात नमूद केलेल्या आहेत. रमाईच्या निधनानंतर माईसाहेबांनी बाबासाहेबांना तळहाताच्या फोडाप्रमाणे जपलं आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारकार्यातील एक शेवटचा दुवा म्हणजे माईसाहेब आंबेडकर. त्यांचं जीवनही अस्वस्थ आणि थक्क करणारे आहे. माईसाहेब यांच्यावर आजपर्यंत खूप कमी लिहलं गेलं आहे.

संकलन: मिलिंद पंडित, कल्याण.

☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 💎 "आधुनिक भारत देशाचा निर्माता" (NATION BUILDER) डॉ. बाबासाहेब आंबेडकर 💎 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️

१. भारत देशाची ३९५ कलम, ८ परिशिष्ट व २२ भागाची राज्यघटना लिहून जगातील संसदीय लोकशाहीचे पुनरुज्जीवन केले.

२. राज्यघटनेने सर्वांना मुलभूत हक्क, अधिकार दिले. तसेच कर्तव्य सुद्धा नमूद केले. याबरोबरच "डायरेक्टीव्ह प्रिन्सिपल" देवून सरकारच्या जबाबदाऱ्यांची तरतूद केली.

३. राज्यघटनेमुळे सामाजिक व भौगोलिकदृष्ट्या भिन्न असलेल्या देशाला एक केले.

४. भारताच्या प्रत्येक नागरीकाला मतदानाचा अधिकार दिला.

५. १८ वर्षांवरील प्रौढ मतदानाचा प्रत्येक नागरिकाला अधिकार देवून जगातील प्रथमच प्रयोग केला.

६. भारतात प्रथम अर्थशास्त्राचा पाया रचला. "रिजर्व बँक ऑफ इंडिया" च्या स्थापनेचा पाया रचला.

७. संविधान लिहून स्त्रीयांना शिक्षणाचा अधिकार दिला. स्त्रीयांना नोकरी करण्याचा अधिकार दिला. अन्यथा देशातील महिला आजही "चूल आणि मुल" सांभाळत बसल्या असत्या.

८. स्त्रीयांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क मिळवून दिले. त्यांच्या हक्क व अधिकारासाठी हिंदू कोड बिल संसदेत मांडले. हिंदू कोड बिल मंजूर नाही झाले म्हणून मंत्रिमंडळातून मंत्रीपदाचा राजीनामा दिला.

९. नोकरी करणाऱ्या स्त्रियांसाठी गर्भावस्था काळात ६ महिन्याच्या भरपगारी रजेची तरतूद केली. जगात अशी तरतूद करणारे भारत हे पहिले राष्ट्र आहे.

१०. मुलींना वडीलांच्या चल-अचल संपत्तीवर मुलांच्या इतकाच समान अधिकार मिळवून दिला.

११. पुरुषांना एक पत्नित्व अधिकार दुसरी पत्नी असेल तर पत्नीला पतीच्या संपत्तीमध्ये हिस्सा मागण्याचा अधिकार मिळवून दिला.

१२. नियोजन आयोगाची स्थापना केली.

१३. पंचवार्षिक योजनांची सुरुवात केली.

१४. भारतात प्रथम जलनिती तयार केली व "नद्या जोडणी प्रकल्प" आखला पण राजकिय इच्छाशक्तीच्या अभावामुळे त्याची अंमलबजावणी झालेली नाही आणि त्यामुळे या देशात काही भागात पुरसदृश्य परिस्थिती व काही भागात पाण्याअभावी शेतकरी आत्महत्या करित आहेत.

१५. भाकरा नांगल, दामोदर धरण, सोनाकूड, हिराकुंड धरण, प्रकल्पाचे उद्गाते.....

१६. 'कोसी नदीवर धरण बांधा त्यामुळे बिहारमध्ये कधीच पूर येणार नाही.' हेसुद्धा त्यांनीच सांगितले.

१७. भारतात प्रथम परिवार नियोजनाचा नारा दिला.

१८. भारतात बालमजुरीवर रोख लावली.

१९. कोलंबीया विद्यापीठात असतांना ३ वर्षात २९ अभ्यासक्रम (११ इतिहास, ६ समाजशास्त्र, ५ तत्वज्ञान, ४ मानववंशशास्त्र, ३ राजकारणाचे) करणारा पहिला आणि शेवटचा व्यक्ती...

२०. मजुरांना १२ तास काम करावे लागायचे, त्यासाठी ८ तास काम व आठवड्यातून १ सुट्टी कायदा केला.

२१. ८ तासापेक्षा जास्त काम केल्यास कामाचा मोबदला प्रावधान लागू केले.

२२. 'खोत बिल' आणून सावकारी आणि वेठबिगारीचा अंत केला.

२३. भारताला उच्च-नीच जातीवादातून मुक्त केले... नाहीतर चांभाराच्या मुलांनी चांभारकी, लोहाराने लोहारकी, सोनाराने सोनारकी, मराठ्याने शेती, ब्राह्मणाने शिक्षण घ्यावे व पुजारी बनावे... असे करावे लागे पण, बाबासाहेबांच्या योगदानाने आज कोणत्याही जातितील मुले डॉक्टर, इंजीनियर, वकील, IAS, IPS, मोठमोठे अधिकारी होवू शकतात...

२४. देशातील ८०% जनतेला जिला आजपर्यंत क्षुद्र, अस्पृश्य म्हणून सर्व अधिकारांपासून हिणवण्यात आले, अत्याचार सहन करावे लागत होते, त्यांना समान अधिकार मिळवून दिले व मानवमुक्तीचा आदर्श रचला...

२५. रिजर्व बँक ऑफ इंडियाच्या स्थापनेत महत्त्वपूर्ण योगदान.

२६. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात महत्वपूर्ण योगदान...

२७. “मुंबई हि फक्त महाराष्ट्राचीच आहे आणि ती मिळवून देण्यासाठी मी माझ्या अंतापर्यंत लढेन” अशी घोषणा केली...

२८. "मजुरमंत्री" असतांना विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना आणली.

२९. उर्जानिर्मिती व्यवस्थापनासाठी ‘सेन्ट्रल टेक्निकल पावर बोर्ड (CTPB) ची स्थापना केली.

३०. देशात प्रथमच पाटबंधारे आणि सिंचन आयोगाची स्थापना केली.

३१.पाण्याच्या व्यवस्थापना साठी नैसर्गिक संसाधन व कोळसा आयोगाची स्थापना केली...

३२. शेती, उद्योग~कारखाने यांच्या विकासासाठी RCC (रिकन्स्ट्रक्शन कमिटी कौन्सिलची स्थापना केली)

३३. बिहार, मध्यप्रदेशाचे विकास व्हावे यासाठी विभाजन करावे अशी सूचना मांडली. आज भरपूर वर्षांनंतर छत्तीसगढ आणि झारखंड राज्य निर्माण झाले...

३४. शिक्षक भारताच्या मणक्याचा कणा आहे त्याला योग्य वेतन द्यावे यासाठी योगदान..

३५. स्त्रीभ्रूण हत्त्या विरोध, व गर्भपात करू नये यासाठी जनजागृती...

३६. देशाला उपराजधानी ची गरज आहे हे सांगणारे प्रथम व्यक्ती...

३७. देशात कोळसा अर्जेपेक्षा सौर अर्जेपासून चालणारे जलविद्युत प्रकल्प उभे करावेत हे सांगणारे प्रथम व्यक्ती जे अजूनही झालेले नाही...

३८. 'मी कायदेमंत्री बनण्यापेक्षा मी कृषिमंत्री होऊन शेतकऱ्यांना न्याय मिळवून देईन व देशात शेतीचा विकास करून शेतकऱ्यांचे राज्य प्रस्थापित करेन.' असे विधान करणारेसुद्धा बाबासाहेबच...

३९. बाळ गंगाधर टिळक यांच्या मुलाने आत्महत्या केली, त्या वेळेस भविष्यात कोणी आत्महत्या करू नये म्हणून भावपूर्ण लेख लिहून त्याला आदरांजली दिली व कायदा मजबूत केला.

४०. ३ लष्कर प्रमुख कधीच एकत्र येऊन देशाविरोधी कृत्य करू नये हे सांगून तशी मांडणी केली.

४१. एकमात्र भारतीय ज्यांना ब्रिटीशांकडून गोलमेज परिषदेला येण्याचे विशेष निमंत्रण दिले जायचे.

४२. एकमात्र असे व पहिले भारतीय नेता ज्यांनी स्त्रिया, ओबीसी व एसटी प्रवर्गासाठी असलेले बिल पास न झाल्यामुळे मंत्रीपदाचा राजीनामा दिला.

४३. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे देशातील पहिले उच्चशिक्षित अर्थशास्त्री होते.

४४. ते एक चांगले वायोलिन वादक, शिल्पकार व चित्रकार सुद्धा होते...

४५. त्यांचे एकूण ९ भाषांवर प्रभुत्व होते. इंग्रजी, मराठी, हिंदी, गुजराती, पारसी, संस्कृत, जर्मन, फ्रेंच, व पाली.

४६. त्यांनी पाली भाषेवर इतके प्रभुत्व मिळविले. पाली व्याकरण व शब्दकोशाची सुद्धा निर्मिती केली...

४७. त्यांनी संसदेत मांडलेली महत्वाची विधेयके:- महार वतन बिल, हिंदु कोड बिल, खोत बिल, मंत्र्यांचे वेतन बिल, रोजगार विनिमय सेवा, पेंशन बिल, भविष्य निर्वाह निधी (पी एफ) बिल इ.

४८. मराठी हि राजभाषा व्हावी यासाठी संसदेत मत मांडले...

४९. पाण्यासाठी आंदोलन करणारे (महाड सत्याग्रह) जगात पहिले व्यक्ती...

५०. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये सर्वात जास्त पुस्तके वाचणारे पहिले व शेवटचे व्यक्ती. ...

५१. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मधून डी. एस. सी. पदवी मिळवणारे प्रथम व शेवटचे भारतीय...

५२. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स मध्ये आठ वर्षांचा अभ्यासक्रम ३ वर्षात करणारे जगातील प्रथम व शेवटचे व्यक्ती, ते सुद्धा भारतीय...

५३. देशात भविष्य निर्वाह निधी (पी. एफ.) कायदा आणून कामगारांच्या हक्काचे संरक्षण केले.

५४. देशातील जनतेला वैयक्तिक आयुर्विमा घेण्यासाठी आयुर्विमा महामंडळाची स्थापना करण्यासाठी कार्य केले..

५५. देशात इम्प्लॉयमेंट एक्स्चेंजची निर्मिती केली व सर्व समाजातील बेरोजगारांना नौकरीचे दरवाजे खुले केले...

५६. अन्याय, आत्याच्यार विरोधात आवाज उठविण्यासाठी एक कुशल पत्रकार म्हणून मुकणायक, बहिष्कृत भारत, प्रबुद्ध भारत व जनता पाक्षिक-सप्ताहिक सुरु केले...

५७. 'बहिष्कृत हितकारिणी सभेची' स्थापना करून जाती अंतांची चळवळ सुरु केली.

५८. दुसऱ्या गोलमेज परिषदेत *"अस्पृश्यांचे प्रतिनिधी"* म्हणून उपस्थित राहिले...

५९. अल्पसंख्यांकाविरोधात काँग्रेसच्या धोरणाला गोलमेज परिषदेत वोरोध...

६०. बहुजनांसाठी मो. क. गांधी यांच्याशी वैचारिक संघर्ष करून पुणे करार केला...

६१. बहुजनांच्या राजकीय, सामाजिक हक्कांसाठी कॉंग्रेस पक्षाशी संघर्ष केला...

६२. राज्यघटना बनविण्यापूर्वी, १९३४ साली घटनात्मक दुरुस्ती करता निर्माण करण्यात आलेल्या पार्लमेंटरी कमिटीचे सन्माननीय सदस्य...

६३. हिंदू धर्मातील चातुर्वर्ण्य पद्धती, विषमता व अन्याय-अत्याचाराला कंटाळून १९३५ साली येवला येथे भरलेल्या परिषदेमध्ये 'मी हिंदू म्हणून जरी जन्मलो असलो तरी हिंदू म्हणून मरणार नाही' अशी घोषणा केली...

६४. हिंदूसाठी काळाराम मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह केला...

६५."UNTOUCHABILIT" हा शब्द बोधिसत्व, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लिखाणातून इंग्रजी भाषेत घेण्यात आला....

६६. भारताचे पहिले कायदेमंत्री होण्याचा बहुमान...

६७. त्यांनी स्थापन केलेल्या संघटना: बहिस्कृत हितकारणी सभा, ऑल इंडिया शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन, दि बॉम्बे म्यूनिसिपल लेबर युनियन इ.

६८. पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना...

६९. सिद्धार्थ कॉलेज ऑफ कॉमर्स आणि इकोनॉमिक्सची स्थापना.

७०. सिद्धार्थ कॉलेज ऑफ लॉ ची स्थापना...

७१. बुद्ध धम्माच्या प्रचार-प्रसारासाठी बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडिया ची स्थापना केली....

७२. औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना...

७३. भारताच्या राष्ट्रीय ध्वजाच्या मध्यभागी 'अशोक चक्र' असण्याला संसदेत मान्यता मिळवून दिली...

७४. भारताला राष्ट्रीय चिन्ह "अशोक चिन्ह" मिळवून दिले जे बुद्ध धम्मचक्र आहे....

७५. बुद्ध धम्माचे प्रतिक निळ्या रंगाला राष्ट्रीय रंग, धम्माचे प्रतिक कमळ फुलाला राष्ट्रीय फुल, बोधिवृक्ष (पिंपळ)

राष्ट्रीय वृक्ष राष्ट्रीय प्रतीके मिळवून दिली....

७६. 'सत्यमेव जयते' सम्राट अशोक कालिन ब्रीदवाक्य भारताचे ब्रीदवाक्य म्हणून पुनरुज्जीवित केले...

७७. राष्ट्रीय ध्वज समितीचर अध्यक्ष म्हणून त्याच्या सन्मानाच्या निरंतरतेसाठी कायदा बनविला...

७८. भारताला चौरंगा ध्वज म्हणजेच राष्ट्रीय ध्वजाच्या मधोमध निळे अशोकचक्र अशी अनोखी भेट दिली...

७९. त्यांना मिळालेल्या उपाध्या (सन्मान):- ⚜ भारत रत्न (भारत सरकार), ⚜ द ग्रेटेस्ट मॅन इन द वर्ल्ड (कोलंबिया विद्यापीठ), ⚜ द युनिवर्स मेकर (ऑक्सफर्ड विद्यापीठ), ⚜ द ग्रेटेस्ट इंडियन (CNN IBN व History वृत्त वाहिनी) इत्यादी असे बरेच सन्मान मिळाले...

८०. एकमात्र भारतीय ज्यांनी पुस्तकांसाठी एक घर बनविले...

८१. विश्वातील एकमात्र व्यक्ती जयंच्याकडे ५०००० पेक्षा पुस्तके, ग्रंथ संच आहेत...

८२. महापुरुष इतिहास घडवितात पण हे असे आहेत की ज्यांनी ५००० वर्षांचा विषमतवादी, रूढी परंपरांनी वेढलेला इतिहास बदलला...

८३. पाकिस्तानमधे एका भारतीयाची जयंती साजरी होते ती व्यक्ती म्हणजे बोधिसत्व, विश्वरत्न बाबासाहेब डॉ. भीमाराव रामजी आंबेडकर...

८४. बोधिसत्व, विश्वरत्न बाबासाहेब डॉ. भीमाराव रामजी आंबेडकर एक महान अर्थशास्त्री, समाजशास्त्री, विधि ज्ञ राज्य घटनाकार आधुनिक भारताचे जनक, इतिहासाचे गाढे अभ्यासक व स्वतः घडविणारेसुद्धा, मानववंशशास्त्र अभ्यासक, पाली साहित्याचे महान अभ्यासक, बौद्ध साहित्याचे महान अभ्यासक "बोधिसत्व", महान तत्ववेत्ते, निष्णात राजकारणी, दिन-दलित-महिला-मजूर यांचे उद्धारक विज्ञानवादी शोधाचे समर्थक, संस्कृत व हिंदू तसेच इतर सर्व प्रचालीत धर्माचे गाढे अभ्यासक होते...

“आधुनिक भारत देशाचा निर्माता” (NATION BUILDER) हे एकच... ते म्हणजे बोधिसत्व, विशवरत्न, परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

आपला धम्मबंधू: राज जाधव.

☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 💎 भारतीय संविधानाबद्दल प्रश्नोत्तरांरुपी अनन्यसाधारण माहिती आम्ही पोहोचवत आहोत. भारतीय संविधानाची मुख ओळख लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत व्हायला हवी म्हणून काळजीपूर्वक वाचावी.

१) अस्पृश्यता पाळणे हा कोणत्या कलमाने दंडनीय गुन्हा आहे?

👉 कलम १७

२) संविधानाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष कोण होते?

👉 डॉ. बाबासाहेब आंबेडकर

३) संविधानात एकूण किती परिशिष्टे आहेत?

👉 १२ परिशिष्टे

४) संविधानात एकूण कलमे किती?

👉 मूळ ३९५ कलमे (सध्यस्थितीत ४४८)

५) घटनेनुसार संघराज्याची अधिकृत भाषा कोणती?

👉 हिंदी {इंग्रजीचाही वापर होऊ शकतो} (हा घटना समितीतील सर्वाधिक वादाचा मुद्‌दा होता, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या आठवणीत नमूद केले आहे.)

६) संविधानाच्या निर्मितीसाठी किती वेळ लागला?

👉 २ वर्ष ११ महिने १७ दिवस

७) भाषणस्वातंत्र्य आणि अभिव्यक्तिस्वातंत्र्य कोणत्या कलमाच्या अधिकारात येते?

👉 कलम १९ ते २२

८) नवीन राज्यांची निर्मिती कोणत्या कलमांतर्गत येते?

👉 कलम २

९) कोणत्या कलमांतर्गत समाजातील मागास घटकांच्या (विशेषतः आदिवासी व दलित घटकांना) उन्नतीस शासन बांधील आहे?

👉 कलम ४६

१०) संविधानात कोणाचे हस्तलेखन आहे?

👉 बिहारी नारायण रायजादा (कॅलिग्राफी पद्‌धत), संविधान लिहिण्यासाठी २५४ दौत आणि ३०३ पेन वापरण्यात आले.

११) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कोणत्या अधिकाराचे वर्णन 'संविधानाचे हृदय आणि आत्मा' असे केले होते?

👉 घटनात्मक न्यायालयीन दाद मागण्याचा हक्क

१२) संविधान सभेची प्रथम बैठक केव्हा पार पडली?

👉 ९ डिसेंबर १९४६

१३) संविधानात समाविष्ट केलेल्या नागरिकांच्या हक्कांना काय म्हणतात?

👉 मूलभूत कर्तव्य

१४) १. भारतीय संविधानाने कोणते मूल्य स्वीकारले आहे?

👉 धर्म निरपेक्षतेचे

१५) घटनेनुसार निवडणुका निर्भय वातावरणात पार पाडण्याची जबाबदारी कोणावर आहे?

👉 निवडणूक आयोग

१६) संघशासनाला कोणत्या विषयावर कायदे करण्याचा अधिकार नाही?

👉 कायदा आणि सुव्यवस्था

१७) संघशासनाच्या अधिकारांविषयीच्या सुचीला काय म्हणतात?

👉 संघ सुची

१८) 'शोषनाविरुद्धचा हक्क' याअंतर्गत संविधानाने कोणत्या बाबींवर बंदी घातली आहे?

👉 माणसांची खरेदी विक्री, गुलामगिरी व वेठबिगारी, कारखाने, खानी किंवा इतर धोकादायक ठिकाणी मुलामुलींना कामावर ठेवणे.

१९) मूलभूत अधिकारांचे रक्षक (Fundamental rights protector) कोणाला म्हटले जाते?

👉 सरवोच्च न्यायालय, उच्च न्यायालय

२०) भारतीय संविधान संपूर्ण ताकदीने केव्हा लागू झाले?

👉 २६ जानेवारी १९५०

२१) कोणत्या कलमान्वये ६ ते १४ वर्षांपर्यंत मुलांना प्राथमिक शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात आली? (Right to education)

👉 कलम २१

२२) सत्तेचे भारतात कोणत्या ३ प्रकारे विकेंद्रीकरण झाले आहे?

👉 कार्यकारी (प्रशासकीय), कायदेकरी (विधिमंडळ), न्यायालयीन

२३) न्यायालयीन सत्तेचे सर्वोच्च अधिकार कोणाकडे असतात?

👉 सर्वोच्च न्यायालय

२४) आणीबाणीचे कोणते ३ प्रकार आहेत?

👉 राष्ट्रीय आणीबाणी, प्रादेशिक आणीबाणी, आर्थिक आणीबाणी (३५८ व्या कलमानुसार कलम १९ मधील नागरिकांचे सधिकार आणीबाणीच्या काळात आपोआप समाप्त होतात.)

२५) भारतीय संविधानानुसार देशाचा प्रथम नागरिक कोणास म्हटले जाते?

👉 राष्ट्रपती

२६) संविधानातील मूलभूत कर्तव्यांची संख्या किती? (Fundamental duties)

👉 ११

२७) भारतीय सैन्याचा सर्वोच्च सेनापती कोण? (Supreme commander)

👉 राष्ट्रपती

२८) लोकसभेची व राज्यसभेची कमाल सदस्यसंख्या किती?

👉 लोकसभा ५३० राज्यप्रतिनिधित्व, २० संघ शासितप्रदेश, २ राष्ट्रपती एकूण ५५२, राज्यसभा २३८ राज्यप्रतिनिधित्व, १२ राष्ट्रपती एकूण २५०

२९) लोकसभा आणि राज्यसभेच्या २ अधिवेशनांमध्ये जास्तीत जास्त वेळचे अंतर किती असावे?

👉 ६ महिने

३०) राज्याचा कार्यकारी प्रमुख कोण असतो?

👉 राज्यपाल

३१) भारतात एकूण किती राज्यांत विधान परिषद अस्तित्वात आहे?

👉 ६ (सध्या पश्चिम बंगाल मध्येही)

३२) विधानसभेचे वर्षातून कमीतकमी किती अधिवेशन होने गरजेचे आहे?

👉 २ अधिवेशन

३३) सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांची नियुक्ती कोण करतात व एकूण किती संख्या आहे?

👉 राष्ट्रपती करतात व एकूण संख्या ३४

३४) मंत्रिमंडळ कोणाला जबादार असते?

👉 लोकसभेला

३५) कोणत्या कलमांतर्गत बालमजुरी व मानवी तस्करी (Human trafficking) पासून संरक्षण मिळाले आहे?

👉 कलम २३ व २४

३६) अल्पसंख्यांकांना संरक्षण व स्वतःच्या शिक्षणसंस्था स्थापन्याचे स्वातंत्र्य कोणत्या कलमांतर्गत प्राप्त झाले?

👉 कलम २९ व ३०

३७) मूलभूत अधिकारांचे हणन झाले आहे असे वाटल्यास कोणत्याही व्यक्तीला कलम ३२ अन्वये कुठे तक्रार करता येते?

👉 थेट सर्वोच्च न्यायालयात

३८) अनुसूचित जाती, जमाती आणि इतर दुर्बल घटकांचे शैक्षणिक आणि आर्थिक हित संवर्धन कोणत्या कलमांतर्गत करण्यात आले आहे?

👉 कलम ४६

३९) भारतीय संविधान लागू करण्यापूर्वी संविधान सभेच्या किती बैठका झाल्या?

👉 ११ सत्रे (बैठक)

४०) राज्यघटनेच्या अंतिम मसूद्याची एकूण किती वाचणे झाली?

👉 ३; प्रथम वाचन (४ नोव्हेंबर ते ९ नोव्हेंबर १९४८), दुसरे वाचन (१५ ऑक्टोबर ते १७ ऑक्टोबर १९४९), तिसरे वाचन (१४ नोव्हेंबर ते २६ नोव्हेंबर १९४९)

४१) कितव्या वयानंतर सर्वांना सार्वत्रिक प्रोढ मताधिकार दिलेला आहे?

👉 सुरुवातीला २१ वर्षे, परंतु १९८९ साली झालेल्या ६१ व्या घटनादुरुस्तीनंतर १८

४२) संविधानाच्या सरनाम्यातील शब्दांचा योग्य क्रम कोणता?

👉 सर्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य

४३) कायद्यासमोर सर्वांना समान वागणूक ही बाब कोणत्या मूलभूत हक्कांतर्गत येते?

👉 समानतेचा हक्क

४४) भारतीय संविधानानुसार कोणत्या अधिकारांवर निर्बंध टाकता येत नाही? किंवा उल्लंघनहि करता येत नाही?

👉 मूलभूत अधिकार

४५) सध्यस्थितीत अस्पृष्यता निर्मूलन कायद्याचे नाव काय आहे?

👉 नागरी संरक्षण अधिनियम

४६) राष्ट्रपती व उपराष्ट्रपती पदाची निर्मिती कोणत्या कलमांतर्गत झाली?

👉 कलम ५२, कलम ६३

४७) कलम ७८ नुसार राष्ट्रपतीने वेळोवेळी मागितलेली माहिती पूरविने कोणाचे कर्तव्य आहे?

👉 प्रधानमंत्री

४८) राष्ट्रपतीला वटहुकूम काढण्याचा अधिकार कोणत्या कलमांतर्गत आहे?

👉 कलम १२३

४९) भारतीय संविधानाचे नागरिकांप्रती मुख्य उद्दिष्ट्य काय?

👉 न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता

५०) भारतीय राज्यघटनेचे सिल्पकार कोणास म्हटले जाते?

👉 डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कारण संविधान बनविण्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा संपूर्णपणे सिंहाचा वाटा व महत्वाचे योगदान होते आणि त्यांनी ते अथक परिश्रमाने, जोमाने व प्रभाविपणे जोपासले.

जय संविधान!

☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 *भारतीय संविधानाची प्रास्ताविका**मधील प्रत्येक शब्दाचा अर्थ समजून घेवूया अगदी सहज सोप्या भाषेत, तसेच संविधान प्रास्ताविक किती महत्वाची आहे हे समजून घेवून प्रसार करु या*

****

🔅 *आम्ही*: स्वातंत्र्यापुर्वी आपण एकत्र नव्हतो. विखुरलेले होतो. संविधानाने "मी" ला "आम्ही" केले.

🔅 *भारताचे लोक*: विविध वतने, राजांची स्वतंत्र राज्ये, वेगवेगळे व आपापले भूभागाचे लोक एकमेकांना एकाच देशाचे समजत नसत. यांना संविधानाने एका देशाचे/भारताचे नागरिक/लोक म्हंटले.

🔅 *सार्वभौम*: आपण आपल्या देशात आपल्याला योग्य वाटतील असे निर्णय घेण्यास स्वतंत्र आहोत.

🔅 *समाजवादी*: आमच्या देशात गरिब आणि श्रीमंत यांच्यात मोठी दरी असणार नाही. देशाच्या संपत्तीवर सर्वांचा हक्क असेल. संपत्तीचे काही मोजक्या लोकांच्या हाती केंद्रीकरण होणार नाही याची काळजी घेतली जाईल.

🔅 *धर्मनिरपेक्ष*: विविध धर्मांचे लोक असणारा देश चालवताना मात्र शासनातील व्यक्तींना काम करताना कोणताही धर्म असता कामा नये. कोणत्याही एकाच धर्माला राज्याचा धर्म मानला जाणार नाही. धर्म हा व्यक्तिपुरता असावा. तो रस्त्यावर आणु नये.

🔅 *लोकशाही गणराज्य*: लोकांकडून/मतदानाद्वारे निवडलेला प्रतिनिधी या राष्ट्राचे काम पाहील. लोकांच्या मतालाच प्रचंड किंमत असेल. लोक ठरवतील त्यांचीच टीम लोकांचे भले करणारे काम करण्यासाठी निवडली जाईल.

🔅 *घडवण्याचा*: वरीलप्रमाणे असणारा असा देश निर्माण करण्याचा महत्वाचा उद्देश आहे.

🔅 *सामाजिक न्याय*: व्यक्तींमध्ये जात धर्म वंश भाषा प्रदेश जन्मस्थान किंवा लिंग यावर आधारित कोणताही भेदभाव केला जाणार नाही माणूस म्हणून सर्वांचा दर्जा सारखाच असेल. अस्पृश्यतेसारखी, बिहिष्कृत करण्यासारखी परिस्थिती निर्माण न होऊ देणारा.

🔅 *आर्थिक न्याय*: कोणाही एकाच प्रकारच्या कामासाठी समान वेतन, मूल्य दिले जाईल. देशातील प्रत्येकाला कोणत्याही भेदभावाशिवाय आपल्या आवडीप्रमाने उपजीविकेचे साधन मिळविण्याचा हक्क आहे.

🔅 *राजनैतिक न्याय*: लोकशाही प्रक्रियेत महिला, पुरुष व अन्यलिंगीय व्यक्तींना व प्रत्येक घटकास निवडणूक प्रक्रियेत आपला सहभाग नोंदविता येईल व त्याला त्याचे मत देण्याचा व निवडणूक लढविण्याचा अधिकार असणार.

🔅 *विचार स्वातंत्र्य*: देशाच्या नागरिकास स्वतंत्रप्रमाने विचार करण्याचे स्वातंत्र्य असेल. त्यावर कुणाचाही अंकुश असणार नाही.

☼ *अभिव्यक्ती स्वातंत्र्य*: प्रत्येकास आपला विचार मांडण्याची मुभा असेल. विचार मांडतांना व्यक्तिद्वेषी विचार नसतील तर त्यावर कुणाचेही बंधन नसेल. लिहिणे, बोलणे, सादर करणे याचे स्वातंत्र्य असेल.

☼ *विश्वास स्वातंत्र्य*: प्रत्येकास आपण मानत असलेल्या मूल्यानुसार विश्वास ठेवण्याचे स्वातंत्र्य असेल. त्यावर कुणाचे बंधन नसेल.

☼ *श्रद्धा व उपासना स्वातंत्र्य*: प्रत्येक व्यक्ती कोणत्याही धर्मावर श्राद्ध ठेवू शकतो व त्यानुसार उपासना करू शकतो. धर्मांतर करणे, धर्म स्वीकारणे किंवा नाकारण्याचा अधिकार प्रत्येक व्यक्तीस असणार आहे.

☼ *दर्जाची समानता*: प्रत्येकास समान वागणूक दिल्या जाईल याची खात्री. त्याचा अपमान होणार नाही अशी व्यवस्था. कुणासही आपला दर्जा उंचावण्याचा अधिकार असेल. आर्थिक, सामाजिक व इतर प्रकारचा दर्जा उंचावतांना त्या व्यक्तीस कुणीही आडकाठी करणार नाही.

☼ *संधीची समानता*: प्रत्येक नागरिकास समान संधी व समान काम मिळेल याचे नियोजन असेल. कोणत्याही कारणाने कुणास संधीच उपलब्ध होणार नाही अशी स्थिती राहणार नाही. लोकांना आपली प्रगती साधता येईल.

☼ *व्यक्तीची प्रतिष्ठा*: नागरिकांना आपली प्रतिष्ठा आबाधित ठेवता येईल असे वातावरण निर्माण केले जाईल. कुणाच्याही प्रतिष्ठेत ठेच लागणार नाही याची आपण काळजी घेऊ.

☼ *राष्ट्राची ऐकता*: राज्य, भाषा, वेश तसेच राज्यांचे सिमावाद सामंजस्याने निकाली काढून देशांतर्गत फुट निर्माण होणार नाही याची काळजी घेतली जाईल.

☼ *राष्ट्राची एकात्मता*: विविधतेने नटलेले राष्ट्र एकात्म राहायला हवे. आम्ही एकमेकांमधे इतके मिसळून जावे कि एकापेक्षा दुसरा वेगळा आहे असे चित्रही न दिसावे. असे आश्वासन मिळावे.

☼ *बंधुता*: देशातील नागरिकांनी एकमेकांशी वागतांना बंधुत्व भावनेने वागावे जगावे. प्रत्येक व्यक्ती आपलाच आहे ही भावना निर्माण व्हावी.

☼ *प्रवर्द्धीत करण्याचा*: वरील सर्व भारतात निर्माण करून त्यावर प्रवर्द्धीत करण्याचा अधिकार आहे.

☼ *संकल्पपूर्वक निर्धार*: मनामध्ये पक्का विचार करून ठेवून मनात नक्की करून संकपल्पूर्वक निर्धार करावा...

आमच्या संविधानसभेत आज दि. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी याद्वारे हे संविधान आमलात आणले....

☼ *अंगिकृत*: भारतीय संविधान "स्वीकारून" अंगिकृत करावे.

☼ *अधिनियमित*: या बाबतचा नियम, कायदा बनवून स्वतः प्रत अर्पण करित आहोत.

आशा आहे, संविधान प्रस्ताविकेचे महत्व लक्षात आले असेल.

☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 💎 माझे संविधान, माझा अभिमान 💎 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️

माझा भारत देश महान आहे म्हणून भारतीय नागरिक असल्याचा मला अभिमान आहे. माझा भारत देश जगातील सर्वात मोठे लोकशाही राज्य आहे. माझ्या भारत देशाचा इतिहास हा खूप मोठा प्राचीन आणि सांस्कृतिक वारसाचे नेम जोपासलेला आहे. प्राचीन भारतीय संस्कृती ही माझ्या भारत देशाला लाभलेली सर्वात मोठी देणगी आहे. हजारो तेजस्वी परंपरा माझ्या भारताला लाभली आहे.

भारतात राहणारे विविध जातीचे धर्माचे लोक आणि भारताच्या प्रत्येक राज्याची विशेष असी बोलली जाणारी भाषा ही माज्या भारत देशाचे वैशिष्ट्य आहे. भारतामध्ये बोलल्या जाणाऱ्या सर्व भाषासाहित्य आणि समृद्ध आहेत. हिंदी भाषा ही माझ्या भारत देशाची राष्ट्रभाषा आहे तर सत्यमेव जयते हे भारताचे ब्रीदवाक्य आहे. जनगणमन हे भारताचे राष्ट्रीय गीत आहे. विश्व विजयी असा *"चौरंगा राष्ट्रध्वज"* (वरी केशरी, मधे पांढरा व त्यावर निळे अशोकचक्र व खालती हिरवा रंग म्हणून चौरंगा ध्वज) माझ्या भारताचा राष्ट्रध्वज आहे.

संपूर्ण विश्वाला शांतीचा संदेश देणारे अशोकचक्र ही भारताची अस्मिता आहे. रुपया हे भारताचे चलन आहे. कमळ हे माझ्या भारताचे राष्ट्रीय फुल आहे. तर वाघ हा माझ्या भारताचा राष्ट्रीय प्राणी आहे.

माझ्या भारत देशाला स्वातंत्र्य देण्यासाठी कित्येक महान क्रांतिकारी आणि पुरुषाने आपल्या प्रणांची आहुती दिली. छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता जिजाऊ, महात्मा ज्योतीराव फुले, सावित्रीमाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, या महान पुरुषांच्या आणि स्त्रियांच्या बलिदानाच्या रक्ताने माझ्या भारत देशाला महान बनविले आहे.

स्वतःच्या प्राणाचा त्याग करून माझ्या भारत देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी कित्येक महान क्रांतिकारी धडपडले अखेर माझ्या भारत देशाला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले. माझा भारत देश स्वातंत्र्य झाला. त्यानंतर २६ जानेवारी १९५० रोजी माझा भारत देश प्रजासत्ताक झाला व माझ्या देशात संविधान लागू झाले. तसेच माझ्या भारत भूमिमध्ये अनेक रत्नांनी जन्म घेतला. भगवान बुद्ध, महावीर, सम्राट अशोक अशा अनेक रत्नांनी माझ्या भारत भूमीला पावन केले. दया, क्षमा, शांतता, समाजप्रबोधन घडविणाऱ्या संतांचा वारसा माझ्या भारत देशाला लाभला.

देशाचे संविधान त्या देशाची मानसिकता, इच्छा आणि आकांक्षा लक्षात घेऊन तात्काळ आणि दीर्घकालीन गरजा लक्षात घेऊन बनविले जाते. कारण संविधान हे राष्ट्रीय अस्मितेचे प्रतिक आहे. भारत एक लोकशाही प्रधान देश आहे आणि त्याचे संविधान जगातील सर्वात मोठे आहे.

भारताचे हे संविधान बाबासाहे डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांनी लिहिले आहे. भारतीय संविधान हे मूलभूत अधिकार, त्याच्या नागरिकांसाठी निर्देशक तत्वे आणि सरकारी संस्थांचे अधिकार तसेच कर्तव्ये याविषयींचे लिखित दस्तऐवज आहे. जे लोकांना त्यांचे मूलभूत, राजकीय, सामाजिक हक्क देते. त्यात ४४८ लेख, १२ वेळापत्रक, आणि ९४ सुधारणा आहेत. त्याचबरोबर घटनेनुसार भारताला प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून घोषित करण्यात आले आहे.

आजच्या आधुनिक भारताने तर सर्व क्षेत्रांमध्ये आपली कामगिरी दाखविली आहेच खेळापासून ते चित्रपटश्रुष्टि परयंत माझा भारत देश अव्वल दर्जावर आहे. माझ्या भारत देशाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे माझा भारत देश कृषी प्रधान आहे. माझ्या भारत देशातील बहुतांश जनता हे शेतीवर अवलंबून आहे.

अलीकडच्या काही वर्षांपासून माझ्या भारत देशाला स्वच्छ भारत व सुंदर भारत करण्याचा प्रयत्न सुरु आहे. तसेच माझ्या भारत देशातील प्रत्येक जनता आत्मनिर्भर आणि स्वावलंबी कसे बनते याकडे लक्ष केंद्रित केले जात आहे.

जगातील अनेक कमजोर देशांना क्षमता मिळवून देण्यासाठी माझा भारत देश कार्यरत आहे. एक उगवती महासत्ता म्हणून संपूर्ण जग माझ्या भारताकडे पाहत आहे. म्हणून तर जागतिक प्रश्नाच्या वेळी जगाला भारत देशाचे मत जाणून घ्यावे लागत आहे. त्यामुळे जगाच्या पाठीवर वावरणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या मनामध्ये एकच मंत्र घुमत आहे ते म्हणजे माझा भारत महान!

प्रजासत्ताक दिनाच्या मंगलमय शुभेच्छा!!

शब्दांकन:- ✍️ राज जाधव.

☸️☸️🦚🦚🦚🌷 विशाखेची दानशूरता 🌷🦚🦚🦚☸️☸️

****

विशाखा ही श्रावस्तीची धनिक महिला होती तिला बरीच मुले व नातवंडे होती जेव्हा तथागत श्रावस्तीत राहत होते तेव्हा त्यांच्या निवासस्थानी विशाखा गेली आणि तिने त्यांना भोजनाचे आमंत्रण दिले त्यांनी ते स्वीकारले.

त्या रात्री आणि दुसऱ्या दिवशी सकाळीही सारखा पाऊस पडला भिक्खूंनी अंग ओले राहू नये म्हणून आपली चिवरे काढून ठेवली आणि आपल्या उघड्या देहावर पाऊस पडू दिला.

दुसऱ्या दिवशी तथागतांचे भोजन संपल्यावर त्यांच्याजवळ बसून विशाखा त्यांना म्हणाली भगवान मला आपल्याकडून आठ वर हवे आहेत.

भगवान म्हणाले विशाखा वर कोणते आहेत ते समजल्या वाचून तथागत वर देऊ शकत नाहीत. विशाखा बोलली मी मागणार आहे ते वर उचित आणि निरुपद्रवी असेच आहेत.

तथागतांनी अनुज्ञा देताच विशाखा बोलली भगवान आयुष्यभर वर्षाकालात भिक्खू संघाला चिवरे द्यावी अशी माझी मनीषा आहे तसेच विहारात दाखल होणाऱ्या आणि बाहेर जाणाऱ्या भिक्खूंना व आजारी तसेच त्यांची शुश्रूषा करणाऱ्या भिक्खूंना भोजन द्यावे आजारी भिक्खूंना औषधे आणि भिक्खू संघाला खीर तसेच भिक्खूणींना स्नानासाठी वस्त्रे पुरवावित अशी माझी इच्छा आहे.

तथागत म्हणाले पण विशाखा तथागतांकडून हे अष्ट वर मागण्यात तुझा काय हेतू आहे?

आणि विशाखा बोलली भगवान मी सेविकेला आज्ञा केली की जा आणि भोजन तयार आहे असे भिक्खू संघाला सांग माझी सेविका त्याप्रमाणे गेली पण ती विहारात पोहोचली तेव्हा पाऊस पडत असल्यामुळे भिक्खूंनी आपापली वस्त्रे उतरून ठेवली असल्याचे तिच्या दृष्टीस आले तिला असे वाटले की ते भिक्खू नसून पावसात देह भिजवून घेणारे कुणी नग्न तपसवी आहेत म्हणून ती परतली तिची समजूत घालून मला पुन्हा तिला पाठवणे प्राप्त ठरले.

भगवान नग्नता अपवित्र आणि किळसवाणी असते. ह्यामुळेच संघाला आजन्म वर्षावासास उपयुक्त अशी वस्त्रे द्यावी असी मी इच्छा प्रकट केली.

माझ्या दुसऱ्या वराबद्दल सांगायचे म्हणजे, दुरून येणारे भिक्खू सरळ मार्ग अपरिचित असल्यामुळे आणि भिक्षा उपलब्ध होईल असे गाव उपलब्ध नसल्यामुळे भिक्षा मिळवितांना वाटेत थकून जातात. भगवान ह्यामुळेच विहारात येणाऱ्या भिक्खूंची आजन्म भोजनाची व्यवस्था करावी असी माझी इच्छा आहे.

तिसरे म्हणजे, बाहेर जाणारा भिक्खू भिक्षा मिळविता मिळविता कदाचित मागे पडेल अथवा जाण्याच्या ठिकाणी उशिरा पोचेल, साहजिकच तो मार्ग काढता काढता तो थकून जाईल.

चौथे म्हणजे, रुग्ण भिक्खूला आवश्यक अन्न मिळाले नाही तर त्याचा आजार वाढेल आणि कदाचित त्याचा अंतही होईल.

पाचवे म्हणजे, रुग्णाची सुशृषा करणाऱ्या भिक्खूला बाहेर जाऊन भिक्षा मिळविण्यास सवड मिळनार नाही.

सहावे म्हणजे, रुग्ण भिक्खूला आवश्यक औषध प्राप्त झाले नाही तर त्याचा आजार वाढेल कदाचित त्याचा अंतही होईल.

सातवे म्हणजे, भगवान आपण खिरीची प्रशंसा केली आहे की, तिच्यामुळे बुद्धी तल्लख होते भूक तहान शमते निरोगी माणसांना ती पौष्टिक आणि रुग्णास पथ्यकारक ठरते म्हणून आजन्म खीर पुरवावी असी माझी मनीषा आहे.

शेवटची म्हणजे, भगवान अचिरावती नदीत भिक्खूणि गणिकां समवेत विवस्त्रावस्थेत तटापासी स्नान करीत असतात, गणिकां त्यावेळी त्यांना खिजवितात आणि बोलतात, तारुण्यात पावित्र्य राखण्यात काय फायदा? वृद्धापकाळी पावित्र्य राखा म्हणजे दोन्ही साधेल. भगवान नग्णता ही स्त्रीच्या बाबतीत अपवित्र किळसवानी आणि तिटकारा आणणारी गोष्ट ठरते.

माझे वर मागण्याचे हे प्रयोजन आहे.

तथागत म्हणाले पण विशाखा तथागताकडून हे आठ वर मागण्यात तुझा स्वतःचा काय लाभ आहे?

विशाखा म्हणाली, वर्षावासासाठी ठिकठिकाणी राहणारे भिक्खू तथागतांना भेटण्यासाठी श्रावस्तीला येतील आणि तथागतांकडे आल्यावर ते विचारतील अमुक अमुक भिक्खू निधन पावला आता त्याला काय गती मिळेल? त्यावर जसी त्याची गती असेल त्याप्रमाणे तथागत सांगतील की त्याला मार्ग फळ प्राप्त झाले आहे किंवा त्याला निर्वान प्राप्त झाले आहे किंवा त्याला अरहणतत्व प्राप्त झाले आहे.

आणि मग मी त्यांच्यापासी जाऊन त्यांना विचारीन की, प्रस्तुत भिक्खू श्रावस्तीत कधी पूर्वी होता काय? आणि होकार मिळाला तर जाणवेल की नक्की वर्षावासासाठी त्याला चिवरे प्राप्त झाले असतील किंवा बाहेर जाणाऱ्या अथवा आत येणाऱ्या त्या भिक्खूला भोजन मिळाले असेल किंवा त्या रुग्णा इतका किंबा त्याची सुश्रृषा करणाऱ्याला अन्न मिळाले असेल किंवा त्याला आजारपणात औषध आणि खीर सतत मिळाली असेल.

आणि मग माझ्या मनात प्रसन्नता वाढेल आणि प्रसन्नतेमुळे आनंद प्राप्त होईल आणि आनंदामुळे सर्व देहाला शांती प्राप्त होईल. शांतीच्या प्राप्तीने सुखकर तृप्तीची अनुभूती मिळेल आणि त्या अनुभूतीने माझ्या हृदयात शांती निर्माण होईल एक प्रकारे माझ्या नैतिक सामर्थ्यांचा किंवा सप्तसंबोधीचा उपयोग केल्यासारखे होईल. भगवान हे आठ वर मागण्यात माझा लाभ होणार होता.

त्यावर तथागत म्हणाले, विशाखा हे फार बरे! हे फार बरे! की, हे लाभ ध्यानात घेऊन तु हे आठ वर मागितलेस. जे पात्र आहेत त्यांना दान करणे हे सुपीक फळ देणाऱ्या मातीत सुबीज पेरण्यासारखे आहे. उलट जे रोगलोभादी मनोविकाराच्या अधीन आहेत त्यांना दान करणे हे खराब बीज पेरण्यासारखे आहे. दानाचा स्वीकार करणाऱ्याचे मनोवीकर गुण विकासास कुंठीत करून टाकतात.

त्यानंतर तथागतांनी पुढील शब्दात विशाखेचे आभार मानले. शील संपन्न उपासिका श्रद्धायुक्त मनाने आणि निस्वार्थी वृत्तीने जे काही दान देईल ते दान दिव्य दुःख नाशक आणि सुखकारक ठरेलं. अपवित्रता आणि कलंक यापासून मुक्त असलेल्या मार्गाने जीवन कंठीत असतांना सुखी जीवन तिला प्राप्त होईल. सतप्रवृत्तीमुळे तिला सुख मिळेल आणि आपल्या दातृत्वाने आनंद प्राप्त होईल.

विशाखेने पुर्वाराम विहार संघास दान दिला आणि उपासिकांमध्ये व्यवस्थापिका होण्याचा बहुमान तिला लाभला.

☸️☸️🔅🦚🦚🦚🌷 आम्रपालीचे दान 🌷🦚🦚🦚🔅☸️☸️

****

तथागत नादिका मध्ये राहिले असताना त्यांना दुसऱ्या ठिकाणी जावेसे वाटले त्यांनी आनंदाला हाक मारली आणि म्हटले चल आनंदा आपण वैशालीला जाऊ या.

बरं तर सहमती दर्शवून तथागतांना आनंद म्हणाला. नंतर महा भिक्खू संघा सहित तथागत वैशाली कडे निघाले तिथे आम्रपालीच्या आम्रवनात तथागत वास्तव्यास गेले.

तथागत वैशालीस आले असून आपल्या आम्रवनात राहिले आहेत. असे गणिका आम्रपालीला समजले. तिने पुष्कळ शासकीय वाहने मागवून त्यापैकी एकात स्वतः आरूढ होऊन वैशाली हून आपल्या परिवारासह ती आम्रवनाकडे जिथपर्यंत रथ जाऊ शकला तिथपर्यंत ती रथातून गेली, मग खाली उतरून तथागत जिथे होते त्या स्थानापर्यंत पायाने चालत जाऊन जवळ गेल्यावर अभिवादन केले आणि ती एका बाजूस बसली. ती तशी बसल्यानंतर तथागतांनी तिला धम्मोपदेश केला.

नंतर तथागतांना उद्देशून ती म्हणाली भगवान भिक्खू संघासहित मज कडे भोजनास येतील काय?

तथागतांनी मुग्ध राहून सहमती दर्शविली. आपल्या आमंत्रणाचा त्यांनी स्वीकार केला आहे हे पाहताच आम्रपाली आपल्या आसनावरून उठली आणि तिने त्यांना अभिवादन केले नंतर प्रदक्षिणा घालून तिथून ती निघाली.

वैशाली लिच्छविंना समजले की तथागत वैशालीला आले असून आम्रपालीच्या आम्रवनात त्याचे वास्तव्य आहे. त्यांना सुद्धा आपल्या घरी भोजनासाठी तथागतांना आमंत्रित करावयाचे होते. म्हणून त्यांनी बरीचशी शासकीय वाहने सिद्ध करून प्रत्येकात एक एक जण आरूढ होऊन ते परिवारासह ते वैशालीला गेले.

आम्रपालीची आणि त्यांची परस्पर विरुद्ध दिशेने येताना गाठ पडली.

त्या तरुण लिच्छवींच्या रथांना आम्रपालीचे रथ चाकाला चाक आसाला आस आणि जूला जू असे जोराने घासत गेले. तेव्हा ते तिला म्हणाले आम्रपाली आमच्या रथांना अशी टक्कर देत तु का बर निघाली आहेस?

महाराज आत्ताच मी तथागतांना भिक्खू संघासहित उद्या भोजनास येण्याचे आमंत्रण दिले आहे. आम्रपाली बोलली.

हे सौभाग्य आम्हास प्राप्त कर आम्ही तुला एक लक्ष देऊ करतो.

महाराज वैशाली आणि इतर नियंत्रणाखालील प्रदेश जरी आपण मला देऊ केला तरी हा विक्रय मी करणार नाही.

लिच्छवी हातवारे करीत बोलले ह्या आम्रपालीने आम्हास हरविले आणि ते आम्रपालीच्या आम्रवनाच्या दिशेने निघून गेले.

आपल्यावर कुरघोडी झाली हे जाणूनही तथागतांना भेटून फेरविचाराने त्यांच्याकडून आपल्या आमंत्रणाला अग्रक्रम मिळवावा ह्या आसेने आम्रपालीच्या आम्रवनात गेले.

लिच्छवी दुरून येताना दिसताच तथागत भिकखूंना म्हणाले, आपल्यापैकी ज्या कुणी कधी देव पाहिले नसतील त्यांनी ह्या लिच्छविंकडे पाहावे, ह्या लिच्छविंच्या समुदायकडे पाहावे आणि तुलनेन त्यांचे निरीक्षण करावे. हे परलोकातील जणू देवच आहेत.

रथ जाऊ शकतील तिथपर्यंत गेल्यावर लिच्छवी रथातुन उतरले आणि तथागत आसनस्थ होते त्या स्थानी जाऊन नम्रतेने त्यांच्या शेजारी ते बसले.

नंतर तथागतांना उद्देशून ते बोलले, तथागतांनी भिक्खू संघासह उदइक आमचे भोजनाचे निमंत्रण स्वीकारून आमच्यावर कृपा करावी.

हे लिच्छवी जनहो उद्याच्या भोजनाचे आमंत्रण स्वीकारल्याचा मी आम्रपालीला आधीच शब्द दिला आहे. ते म्हणाले.

आम्रपालीने आपल्याला हरविल्याची लिच्छविंची आता खात्री पटली. तथागतांचे आभार माणून आणि त्यांच्या वचनाला मान्यता दर्शवून ते आपल्या असणांवरून उठले आणि तथागतांना अभिवादन करून प्रदीक्षिणा घालून ते निघून गेले.

रात्र होतच गणिका आम्रपालीचे आपल्या प्रासादात साखरभातादि मिष्टांने तयार करून ती तथागतांना म्हणाली, महाराज वेळ झाली भोजन तयार आहे.

पहाटे वस्त्र परिधान केलेल्या तथागतांनी आपले उत्तरीय व भिक्षापात्र घेतले आणि भिक्खू संघासह आम्रपालीच्या प्रासादात ते गेले त्यांच्यासाठी सिद्ध केलेल्या आसणावर ते बसले मग आम्रपालीने त्यांना व भिक्खूंना साखर भात व मिष्ठांने वाढली आणि पोट भरेतो त्यांना जातीने आग्रह केला.

भोजन संपल्यावर तथागतांनी आपले भिक्षापात्र स्वच्छ केले आणि हात धुतले. आम्रपाली नंतर त्यांच्या शेजारी चौरंग ठेवून त्यावर बसल्यावर त्यांना उद्देशून त्यांना म्हणाली.

भगवान आपणांस व आपल्या संघास माझे उद्यान मी अर्पण करीत आहे. तथागतांनी त्या दानाचा स्वीकार केला आणि धम्मोपदेश केल्यानंतर ते निघून गेले.

☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 * 🙏 ☸️ ।। चार प्रकार की उत्तम वाणी।। ☸️ 🙏 * 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️

"सच्चं वे अमता वाचा" अर्थ:- सत्य ही अमृत वचन है।

* 🌷 चार प्रकार की उत्तम वाणी 🌷 *

तथागत गौतम बुद्ध चार प्रकार की उत्तम वाणी को बोलने का उपदेश देते थे और जो उपदेश देते थे, उसे स्वयं पालते थे।

"सुभासितं उत्तममाहु सन्तो, धम्मं भणे नाधम्मं तं दुतियं। *पियं भणे नाप्पियं तं ततियं, सच्चं भणे नालिकं तं चतुत्थं।।"*

अर्थ:- संतो ने सुभाषित वाणी को उत्तम बताया है। धार्मिक वचन बोले, न कि अधार्मिक। यह दूसरी उत्तम वाणी है। प्रिय वचन बोले, न कि अप्रिय। सत्य वचन बोले, न कि असत्य। ये तीसरी और चौथी उत्तम वाणी हैं।

भगवान ने कहा:-सुभाषित वचन वही है जिससे न स्वयं संतापित हो और न दूसरे पीडित हो। आनंद प्रदायक प्रिय वचन ही बोले। पाप की बातें छोड़कर सदा ऐसा बोले जो दूसरों को प्रिय लगे और फिर कहा:-

"सच्चं वे अमता वाचा, एस धम्मो सनन्तनो।"

सत्य ही अमृत वचन है, यह सनातन धम्म है।

*नमो बुद्धाय 🙏 🙏 🙏 *

☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 💎 💎 भगवान शब्द ब्राम्हणांनी बुद्धांपासून चोरलेला आहे. 💎 💎 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️

भगवा हा रंग बौद्ध धम्माचे प्रतिक आहे. भगवा शब्दापासून भगवं, भगवान बनले आहे.

"भगवान" बौद्ध धम्मात 'भगवान' चा अर्थ ईश्वर किंवा परमेश्वर नाही. भगवान शब्दाचा सर्वात पहिले बौद्ध ग्रंथांमध्ये उपयोग केला गेला होता.

नंतर हा शब्द वैदिक/ब्राम्हण ग्रंथांमध्ये वेगळ्या अर्थाने समाविष्ट केल्या जाऊ लागला.

भगवान याचा मूळ अर्थ:- भग्ग + वान = भगवान; भग्ग - भंजन (नष्ट) करणे; वान - तृष्णा (वासना).

याचाच अर्थ असा, ज्या मनुष्याने राग, द्वेष, मोह तसेच तृष्णा यांना नष्ट करून संपूर्ण जीवन अकुशल कर्म आणि चित्ताचा नाश केला आहे. त्याच कुशलकर्मी महापुरुशास 'भगवान' म्हटल्या जाते.

वैदिक/ब्राम्हण:- ज्या मनुष्याने राग, द्वेष, मोह तसेच तृष्णा यांना नष्ट करून 'संपूर्ण भगवान' ब्राम्हणांनी बुद्धांकडून चोरलेला शब्द आहे.

नागवंशी शिल्पा.

☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 💎 #बुद्ध_को_भगवान_क्यों_कहा_जाता_हैं..? 💎 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️

'भगवान' पाली भाषा का शब्द न होकर 'भगवा' शुद्ध पाली है। पाली साहित्य मे बुद्ध को भगवान नहीं अपितु भगवा, भगवातो या भगवंत आदि शब्दों से संबोधित किया गया हैं। 'भगवान' इन्हीं शब्दों का अपभ्रंश हैं। जब तथागत बुद्ध का यह 'भगवान' सम्बोधन/संसार में छा गया तब ब्राम्हणों ने बौद्ध धम्म को हिन्दू धर्म की शाखा और बुद्ध को ईश्वर का अवतार घोषित कर 'भगवान' शब्द को अपने ईश्वर और ईश्वर के अवतारों के नाम के साथ जोड़ दिया। इस प्रकार ब्राम्हणों ने श्रमण संस्कृति को नष्ट करने की दुर्भावना से पाली के 'भगवा' इस अपभ्रंश को 'ईश्वर' का पर्यायवाची बना दिया। बुद्ध उपासकोंद्वारा बुद्ध को जब भगवान कहा जाता हैं तब किसी सृष्टिकर्ता की दृष्टि से या अवतारवाद की दृष्टि से भगवान नहीं कहा जाता। परंतु ईश्वरवादी लोग काल्पनिक ईश्वर को भगवान कहते हैं इसलिए हम तथागत को भगवान सम्बोधित न करे यह भी उचित नहीं लगता। क्योंकि भगवान शब्द प्रयोग से और उसके वास्तविक अर्थ को प्रचारित करने से ही हम भगवान शब्द की मिथ्या धारणा और इसके मिथ्या अर्थ से अपने लोगों को अवगत करवाकर काल्पनिक भगवान से दूर रख सकते हैं और फिर बौद्ध दर्शन के बहुत से वजनदार शब्दों को दूसरों ने चुराया है। उन्होंने शब्द हमसे लिए और अर्थ नये गढ़ दिये है। ऐसे में गलत शब्द जानकर हम कितने शब्द, साहित्य और संस्कारों को छोड़ते चले जायेगें? आवश्यकता हैं, उनके वास्तविक अर्थ से दुनिया को अवगत कराने की।

'भगवान' दो शब्दो से मिलकर बना है, भग और वान। भग का मतलब है भग्न करना, नष्ट करना, भष्म करना और वान का अर्थ हैं तृष्णा, आसव, बंधन। अर्थात जिसने अपनी तृष्णाऐं समाप्त कर दी हो, वह भगवान। भग्गति दोसो, भग्गति रागो, भग्गती मोहो जिन्होंने राग, द्वेष और मोह को भस्म कर दिया हो, समस्त तृष्णावों को भग्न कर दिया,

जो तृष्णावों के बंधन से विमुक्त हो गया, वाही भगवंत की उपाधी का पात्र है| इसी भावना से तथागत को भगवान (भगवंत) कहा जाता हैं| उसी प्रकार 'तथ्य' और 'आगत' से मिलकर *"तथागत"* बना हैं| अर्थात जो सत्य के सहारे चलकर परम सत्य, निर्वान तक पहुचां हैं| 'अरी' और 'हत' से मिलकर अर्हत बना हैं| अरी का मतलब शत्रू और हंता यानी नष्ट करनेवाला होता है| किसी भी व्यक्ती से राग, मोह और द्वेष यही उसके बडे शत्रू होते हैं|

☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 💎 💎 तथागत गौतम बुद्ध 💎 💎 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️

तथागत - तथा आणि आगत या शब्दापासून तथागत हा शब्द तयार झाला.

तथा - तथ्य - सत्य, आगत - आलेला, पोहचलेला; जो सत्यापर्यंत पोहचला तो "तथागत"

भगवान - भग - भग्न आणि वान - वासना; साऱ्या वासना भग्न करणारा "भगवान" म्हणजे देव नाही तर भगवान बुद्ध म्हणजे -सर्व वासना भग्न करून दु:ख मुक्त जीवन कसे जगावे हे तत्वज्ञान शिकविणारा सर्वोत्तम भूमिपुत्र.

बुद्ध - सर्वज्ञ - ज्ञानी वासनांना भग्न करून सत्यापर्यंत जो पोहोचविणारा असतो "ज्ञानी" म्हणून गौतमास - "तथागत भगवान बुद्ध" असे संबोधिले जाते.

"नमो तस्स भगवतो अरहतो सम्मासमबुद्ध"

भवतु सब्ब मंगलं

☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 💎 💎 पिंपळाच्या झाडावर भूत नाही तर पिंपळाच्या झाडाखाली तथागत बुद्ध बसतात! 💎 💎 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️

तथागत बुद्धांनाच पौराणिक कथाकारांनी भूत म्हटले आहे, पिंपळाच्या झाडावर भूत बसतात. असे आजपण ब्राम्हण लोक म्हणतात? जेव्हा की खरेपण हे आहे, पिंपळाच्या झाडावर भूत नाही, तर पिंपळाच्या झाडाखाली बुद्ध बसतात. म्हणजे तथागत बुद्धांना पिंपळाच्या झाडाखाली ज्ञान (बोधी) प्राप्त झाले होते. पिंपळाचे झाड हे तथागत बुद्धांच्या *"ज्ञान प्राप्तीचे"* प्रतिक आहे, यासाठी पिंपळाच्या झाडाला *"बोधिवृक्ष"* म्हटल्या जाते. पौराणिक कथाकारांनी बुधाचे महत्व कमी करण्यासाठी "बुद्धू" आणि "भूत" हे शब्द बनविले आहेत. 'भूत पिशाच निकट नही आवे, महावीर जब नाम सुनावे.' असे हनुमान चालिसांमध्ये उदाहरण मिळतात? त्यांना सांगायचे काही आहे आणि सांगतात काही. त्यांना म्हणायचे आहे की, *"बौद्ध आणि त्यांचे बौद्ध भिक्षु जवळ नाही येणार. जेव्हा आपण शक्तिबलाचे उपयोग करणार, जेव्हा आपण महावीर नाव ऐकविणार."* जेव्हा खरेपणा हा आहे की, तथागत बुद्धानांच *"विरांचा वीर महावीर"* म्हटले आहे. याप्रकरेंपौराणिक कथाकारांची धोकेबाजी आपण समजून घ्यायला हवी.

काही ब्राम्हण म्हणतात की, पिंपळाच्या झाडावर ब्राम्हणाचे भूत असते. ज्याला मुजा म्हटल्या जाते, जेव्हा काही ब्राम्हणाचे मुल ब्राम्हणी संस्कार याला पूर्ण केल्यावाचून मरतात, टरबतो भूत बनून जातो. याप्रकारे ब्राम्हण मुलाचे निवास पिंपळाच्या झाडाबरोबरच विहिरीवर पण असते. पिंपळाचे हे भूत लोकांना जखमी नाही करत, तर लोकांना केवळ घाबरविण्याचे काम करते. कधीकधी ब्राम्हणाव्दारे लिहिल्या गेलेली पौराणिक कथा हे सांगते की, पिंपळाच्या झाडावर स्वतः भगवान श्रीकृष्णाचा निवास असतो. तर कधीकधी त्यांची पौराणिक कथा हे सांगते की, पिंपळाच्या झाडावर ब्राम्हणाचे भूत निवास करते. पिंपळाच्या झाडाला ते कधी, *"श्रीकृष्णाचे"* तर कधी *"ब्राम्हण भुताचे"* राहण्याचे ठिकाण बनविते. यामधील खरेपणा हा आहे की, *"तथागत बुद्धांना पिंपळाच्या झाडाखाली ज्ञान प्राप्त झाले होते."* तथागत बुद्धांना बघू नये/त्यावर लक्ष केंद्रित होऊ नये यासाठी पौराणिक कथाकारांनी वेगवेगळ्या कथा लिहिल्या आहेत.

तथागत बुद्धांनी संपूर्ण विश्वाला ज्ञान दिले होते. यासाठी संपूर्ण विश्वासाठी तथागत बुद्धांचे वेगवेगळे नाव पडले आहे. तथागत बुद्धांना आजपण संपूर्ण जगात वेगवेगळ्या नावांनी ओळखिल्या जाते. अखंड जंबुद्वीपात तथागत बुद्धांचे शेकडो नाव मिळतात. वर्तमानात ब्राम्हण लोक आपल्याला काल्पनिक देवी देवतांचे शेकडो नामावली दाखवितात, त्यांच्या या नामावली मध्ये तथागत बुद्धांचे नाव लपलेले असतात. जसे की, तथागत बुद्धांपासूनच बुद्ध, बुध, बुद्द, बोद, बौद्ध, बोत, बोट, बूत, आणि भूत असे नाव पडले आहेत. यामधून स्पष्ट होते की, ब्राम्हण लोकांनी तथागत बुद्धांनाच भूत म्हटले आहे. एवढेच नाही, तर तथागत बुद्धांचा सरळ संबंध बुद्धी, बुद्धिजीवी, बुद्धिमान या शब्दांपासून होण्याच्या कारणाने लोकांनी जाणूनबुजून *"बुद्धू"* हा शब्द प्रचलित केला. कारण की बुद्धांचा आणखी अपमान केला जाऊ शकेल. तथागत बुद्धांना भूत म्हणून प्रचारात आणणे, पिंपळाच्या वृक्षाला बहुजन लोकांपासून दूर ठेवणे, यापासून आपण समजू शकतो की, या लोकांच्या मनात तथागत बुद्धांच्या प्रती किती द्वेषाची भावना भरली होती. पिंपळाच्या झाडावर भूत नाही, तर पिंपळाच्या झाडाखाली बुद्ध बसत होते, यासाठी ब्राम्हण लोक आपल्याला पिंपळाच्या झाडापासी जाण्यास रुकावट करीत होते. यासाठी ही गोष्ट चांगल्या प्रकारे समजून घ्या की, पिंपळाच्या झाडावर काही भूत वगैरे नसतात, तर पिंपळाच्या झाडाखाली बुद्ध बसत होते. यासाठी पौराणिक कथाकारांनी जाणूनबुजून भुताची कथा प्रचार प्रसारात आणली हेच खरेपणा आहे.

☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 🌹 भगवान बुद्ध आणि सारिपुत्त ह्यांची अंतिम भेट 🌹 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️

****

भगवान बुद्ध श्रावस्तीच्या जेत वनातील गंधकुटी विहारात र‌ाहत होते. पाचशे (५००) भिक्खू सह सारिपुत्त तिथे आला.

त्यांना अभिवादन करून सारिपुत्त म्हणाला की पृथ्वी वरील आपल्या जीवनाचा अंतिम दिवस समीप आला आहे भगवान (भगवंत) आता आपणाला देह त्यागाची परवानगी देतील काय?

भगवान बुद्धांनी सारिपुत्ताला विचारले की परिनिर्वाणासाठी त्याने स्थान निश्चित केले आहे काय?

सारिपुत्ताने त्यांना सांगितले मगध देशातील नालेक नावाच्या गावी माझा जन्म झाला ज्या घरात माझा जन्म झाला ते घर अजून ही तिथे आहे ते माझे घर माझ्या परिनिर्वाणासाठी निवडले आहे.

भगवान बुद्ध म्हणाले, प्रिय सारिपुत्ता तुला बरे वाटेल ते कर.

भगवान बुद्धांच्या चरणावर डोके ठेवून सारिपुत्त म्हणाला, आपल्या चरण वंदनाच्या प्रतिष्ठेच्या एकमेव आशेसाठी एक सहस्त्र कल्पांपर्यंत मी पारमिताला अभ्यास केला होता माझी ही इच्छा आता सफळ झाली आहे आणि त्यामुळे माझ्या आनंदाला पारावार उरलेला नाही.

पुनर्जन्मावर आपला विश्वास नाही त्या अर्थी हीच आपली अंतिम भेट माझ्या अपराधांबद्दल भगवानांनी मला क्षमा करावी माझी अखेर आता समीप आली आहे.

सारिपुत्त क्षमा करण्यासारखे काहीच उरलेले नाही. भगवान बुद्ध म्हणाले.

जेव्हा सारिपुत्त जाण्यासाठी उठला तेव्हा त्याच्या सन्मानार्थ भगवान बुद्ध उठले आणि गंधकुटी विहाराच्या सज्जात जाऊन उभे राहीले. तेव्हा सारिपुत्त भगवानांना म्हणाला, जेव्हा आपले पहिले दर्शन घडले तेव्हा मला आनंद झाला आता आपले दर्शन झाले त्यामुळे मला अत्यानंद झाला आपले हे शेवटचे दर्शन आहे. हे मी जाणून आहे पुन्हा आपले दर्शन होणार नाही.

आपले दोन हात जोडून भगवानांकडे पाठ न करता सारिपुत्त तिथून निघून गेला.

त्यावर उपस्थित भिक्खू वर्गास भगवान बुद्ध म्हणाले, आपल्या जेष्ठ बंधुच्या मागे जा. भिक्खू वर्ग प्रथमच भगवंतांना सोडून सारिपुत्तामागे त्यांच्या आज्ञेप्रमाणे गेला.

आपल्या गावी पोहोचल्यावर सारिपुत्ताने आपल्या घरातील ज्या खोलीत त्याचा जन्म झाला होता, त्याच खोलीत देह ठेवला.

सारिपुत्तांचे देह संस्कार केले गेले व त्यांच्या अस्थी भगवान बुद्धांपासी नेल्या गेल्या.

सारिपुत्ताच्या अस्थी स्वीकारल्यानंतर भगवान बुद्ध भिक्खूंना म्हणाले, तो सर्वोच्च विद्वान होता, त्याच्या पासी संग्रह वृत्तीचा लेशही नव्हता, तो उत्साही आणि कष्टाळू होता, त्याला पापाची घृणा वाटत असे. भिक्खूंनो त्याच्या

अस्थिंकडे ध्यान द्या क्षमा शिलतेत तो पृथ्वीसमान होता, त्याने आपल्या मनात क्रोधाला कधीही प्रवेश करू दिला नव्हता, कोणत्याही इच्छेच्या आहारी तो गेला नव्हता, विकार वशतेवर त्याने विजय मिळवीला होता, करुणा, बंधुभाव आणि प्रीती ही त्याच्या ठाई परिपूर्ण होती.

त्याच सुमारास महामोग्गलायन राजगृहा समीप एका एकांत विहारात राहत होते. भगवान बुद्धांच्या शत्रूने नियुक्त केलेल्या मारेकऱ्यांनी त्यांची हत्या केली.

महामोग्गलायनाच्या दुःखद मृत्युचे वृत्त भगवान बुद्धांना सांगितले गेले. सारिपुत्त आणि महामोग्गलायन हे त्यांचे प्रमुख शिष्य होते. त्यांना धम्म सेनापती असे म्हटले जात असे. आपली धम्म परंपरा पुढे चालू ठेवण्यासाठी ते या उभयतांवर अवलंबून होते.

आपल्या हयातीत झालेल्या त्यांच्या निधनाने भगवान बुद्ध अधिक व्यथित झाले होते. आता श्रावस्तीत राहण्यात त्यांना स्वारस्य उरले नाही म्हणू तिथून निघण्याचे त्यांनी ठरविले.

☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 💎 💎 बुद्ध यांनी ८ प्रकारचे मित्र सांगितले आहेत. 💎 💎 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️

१ परधन हारक मित्र :- फक्त पैशासाठी मैत्री करणारा मित्र.

२ वाचाळ मित्र :- फक्त बोलणारा कधी मदत न करणारा मित्र.

३ खुशामती मित्र :- गोडगोड बोलून, चापलुसी करून काम करून घेणारा मित्र.

४ विनाश सहाय्यक मित्र :- वाम मार्गाला लावणारा मित्र.

५ उपकारि मित्र :- भरभरून देणारा, नसेल तरी कुठून तरी आणून देणारा मित्र.

६ हितेशी मित्र :- मार्गदर्शन करणारा मित्र.

७ अनुकंपक मित्र :- सहानुभूती असणारा मित्र.

८ समान दुःखी सुखी मित्र :- शेवट पर्यंत सुख दुःखात साथ देणारा मित्र. 🍀 🌹

☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 💎 💎 गावागावात बुद्ध भारत बौद्धमय होता व राहणार 💎 💎 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️

गावागावात बुद्ध भारतवर्षातील ऐकेक इट, ऐकेक दगड म्हणतो की भारत बौद्धमय होता आणि राहणार.

१. तथागत बुद्धांशी जुडलेल्या आठवणीं, अवशेष व [धरोहर] वारसा (लेण्या, स्तूप यांची माहिती) यांचा शोध निरंतर चालू आहे. सर्व माहितीवरून ही गोष्ट लक्षात (समोर) येते की, भारत देशात जिथे तिथे बुद्ध विद्यमान आहे. येथे बौद्ध धम्माला नष्ट करण्यासाठी काही कसर सोडली नाही. भारतवर्षातील ऐकेक इट, ऐकेक दगड म्हणतो की भारत बौद्धमय आहे. बुद्धाचे शासन आमच्या मनावर आहे.

पूर्ण भारत आणि दुनियेतील अधिकतर देशामध्ये खोदकामात बुद्ध अवशेष मिळाले आहे. कधी कधी तर युद्धामध्ये विध्वंसा नंतर बुद्धांच्या मुर्त्या जमिनीच्या गर्भातून निघाल्या. एक म्हण पण आहे की, 'झाले युद्ध तर निघाले बुद्ध.' बुद्ध शिलतेने देशातील प्रत्येक राज्यात प्रत्येक गाव गल्लीत अस्तित्वात आहे.

२. इ. स. च्या पहिल्या शतकापर्यंत आशिया महाद्विपमधे अधिकतर देशांमध्ये बुद्ध धम्म स्थापण झाला होता. याची आधारशीला इ. स. पूर्व २५० च्या जवळपास मौर्य वंशाचे सम्राट अशोकाने आपला मुलगा महेंद्र आणि मुलगी संघमित्रा यांना धम्म प्रचारासाठी श्रीलंका येथे पाठविले होते. इ. स. च्या सहाव्या शतकाच्या जवळपास जेव्हा आशिया देशातील मधे सांस्कृतिक, व्यापारीक तसेच राजनैतिक संक्रमानाची वेळ सुरु होती तर अर्बी-तुर्की यात्रेकरू व्यापाऱ्यांना जागोजागी बुद्ध मिळतात.

हे यात्रेकरू व्यापारी चिन, जापान, कोरिया, तैवाण, थायलंड, न्यानमार, भूतान, तिब्बत, अफगाणिस्थान तसेच श्रीलंका अन्य जेथे पण गेले, तेथील पॅगोडा, मठ किंवा विहार आणि स्तूपांनी त्यांचे डोळे दीपून घेतले, हसणारी एक स्मित शांत मूर्ती आवश्यक दिसत होती. जरी स्थानिक व्यक्तींकडून त्या मुर्त्यांच्या विषयी आपल्या जिज्ञासेचे समाधान करू पाहत होते तर एकच उत्तर मिळत, हे 'बुद्ध' आहे. अंतिमतः बुद्ध शब्द अर्बी, फारसी अपभ्रंशीत होऊन 'बूत' झालेला, ज्याचा अर्थच मानल्या गेला मूर्ती. बुद्धांच्या परिणीर्वांनाच्या जवळजवळ ५०० वर्षानंतर भारतातील महायानी शाखेने बुद्धांच्या मुर्त्यांची स्थापना सुरु केली आणि कळांतराने जवळजवळ पूर्ण पश्चिम आशियात बुद्धांचा विस्तार झाला.

चिन, जापान, कोरिया, तैवान, थायलंड, म्यानमार, भुतान, तिब्बत, अफगाणिस्थान, श्रीलंका इत्यादी सर्व जागी. भारतात बौद्ध संस्कृतीचा प्रभाव तसेच विस्तार देशातील कानाकोपऱ्यात होता. जी गोष्ट प्रामाणिकतेनुसार यासाठी सांगितली जाऊ शकते कारण भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाद्वारे खोदकामात आतापर्यंत सर्वात जास्त पुरावे बौद्ध धम्म असल्याचे मिळाले आहेत. खोदकामाची सतत प्रक्रिया आणि बौद्ध धम्माची विश्व व्यापकतेचे स्वतः प्रमाण याच खोदकामातून मिळत राहिले आहे. बौद्ध धम्माचे कारण आजपण भारत विश्वगुरूच्या वैभवाने विभुषित आहे. सम्राट अशोकाच्या काळात भारत (जंबुद्विप) बौद्ध धम्ममय एक अखंड देश होता. भारत प्रदेशात बौद्ध संस्कृतीचा १२०० वर्षांचा गौरवशाली इतिहास आहे, परंतु यावर कुणीही गोष्टी करताना दिसत नाही. हाच तो काळ आहे जेव्हा भारताला सोन्याची चिमणी म्हटल्या जात होते.

भारत सांस्कृतिक, राजनैतिक (प्रजातांत्रिक), आर्थिक रूपाने समृद्ध होता. बौद्ध धम्माचा प्रसार पण येथूनच अन्य देशांत झाला आणि खोदकाम याचे प्रमाण पण देते आहे. आज जगातील १७० देशांमध्ये बौद्ध धम्म कार्यांवित आहे. बांग्लादेश सारख्या छोट्या राष्ट्रात एक कोटी बौद्ध धम्मीय आहेत. या आकड्यांवरून बौद्ध धम्माच्या प्रसाराचा अंदाज लावला जाऊ शकतो. जेथ पर्यंत भारतात बौद्ध धम्माच्या विविध प्रमुख स्थळांची गोष्ट आहे तर हा देश बौद्धमय होता आणि आजपण आहे. जागृत स्थळांचे विवरण केवळ बौद्ध धम्माची एक छोटीसी भूमिका मात्र आहे.

३. बिहार बौद्धगया:- बिहार प्रदेशात असलेले हे एक स्थान आहे, जेथे सिद्धार्थाला सम्यक संबोधी प्राप्त झाली होती आणि ते बुद्ध झाले. उरुवेला मधे निरंजना नदीच्या काठावर *"बोधिवृक्ष"* खाली सिद्धार्थाला बुधत्व प्राप्त झाले. आज बोधगया मधे अनेक देशांनी आपले बुद्ध विहार बांधले आहे. बुधत्व प्राप्तीपूर्वी सिद्धार्थ निरंजना नदीच्या दुसऱ्या किनाऱ्यावर असलेल्या डुंगेश्वरी गुंफेमधे कठीण तपस्या व ध्यान करत होते. ही गुंफा आजपण अस्तित्वात आहे. महाबोधी विहार येथे सर्वात पवित्र आणि दुनियेतील बौद्ध शिल्पांचे सर्वांत सुंदर व भव्य निर्माणांपैकी एक आहे.

राजगिर:- बिहार राज्यात असलेले या स्थळाला बुद्ध काळात राजगृह अथवा राजगढ पण म्हटल्या जात होते. पाच पर्वतांनी घेरले असल्या कारणाने हे सुरक्षित स्थळ मगध राज्याची राजधानीपण होते. बुद्धांच्या वेळी येथे बिंबीसाराचे शासन होते. बुधत्व प्राप्तीच्या नंतर बुद्धांनी दुसरा, तिसरा व चौथा वर्षावास येथे घालवीला होता. राजा बिंबीसाराने बुद्धाला वेळुवन दान दिले होते, तेथे विशाल विहार बनविले होते जे आजपण अस्तित्वात आहे. जापानच्या सहयोगाने येथे राजगिरच्या ग्रुधकूट पर्वतःवर विशाल विश्वशांती स्तूप व भव्य विहार निर्माण झाले आहे.

वैशाली:- बिहार राज्यात असलेले वैशाली स्थळ बुद्धाच्या काळखंडात लिच्छवी वंशाची राजधानी म्हणून विश्वातील प्रथम प्रजातांत्रिक राज्य होते. बुधत्व प्राप्तीच्या ५ व्या वर्षावासास बुद्ध पहिली वेळ वैशालीत आले. त्यांनी ५ वा वर्षावास पण येथेच घालविला. भगवान बुद्धांनी भिक्खुणी संघाची स्थापना येथेच केली, नगरवधू आम्रपाली येथेच संघात शामिल झाली. बुद्धांनी तेवज्ज सुत्त, महाली सुत्त, रतन सुत्त बरोबर अनेक सुत्तांची देशना येथेच केली होती. बिहार राज्याची राजधानी पटणा पासून ४० किमी. दूर असलेल्या या वैशालीमधे बुद्धांनी आपल्या महापरिनिर्वाणाची पूर्व घोषणा केली होती.

केसरिया:- बिहारच्या पटणा पासून १०५ किमी. अंतरावर व चंपारण जिल्हयात असलेले १०४" उंच हा स्तूप विश्वातीला सर्वात उंच स्टुपामध्ये एक आहे. सन १९८८ मधे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण द्वारे खोदकामात याचे अस्तित्वाला दुनियेच्या समोर आणल्या गेले. असी मान्यता आहे की, बुद्ध जेव्हा वैशालिहून केसरियासाठी निरोप घेत होते तेव्हा वैशालीच्या लोकांना भिक्षापात्र दानात दिले होते. यानंतर या भिक्षापात्राला वैशालीच्या मठात ठेवल्या गेले जेथे शेतकरी आणि फळ व्यापारी आपली शेतीतील मिळकत कापल्यानंतर सर्वप्रथम या पात्राला समर्पित (वाहत) करीत होते.

नालंदा:- बिहारच्या पटणा पासून ८० किमी. दुर असलेले नालंदा विश्वविद्यालयाचे रूप विश्वविख्यात नालंदा महाविहार पूर्वी पूर्ण विश्व समूहाचा गौरव होते. हे मानवाचा विकास आणि प्रकृतिशी संबंधित जुळल्या शुद्ध ज्ञानाचे केंद्र होते. आपल्या पूर्व वैभवात येथे १०००० विद्यार्थी आणि २००० अध्यापक होते. येथील काही प्रसिद्ध स्नातकांमध्ये इतसिंग, व्हेंत्सांग, फ्रो-ताऊ-माऊ, ताओ शिंग, हुएं चाओ, धर्मस्वामीन, आर्यभट्ट अन्य प्रमुख आहेत. शिक्षकांमधे येथे १००० शिक्षक असे होते जे ३० विषयांचे ज्ञानी होते व शिक्षण देऊ शकत होते. नालंदाच्या प्राचीन खंडरांमध्ये १२ किमी. दूर राजगिर मधे ४३३ एकर भूमीमधे निर्माणीत व संचालित नालंदा विश्वविद्यालय आपल्या गैरवाला पुनः दोहराण्याच्या दिशेत अग्रेसर आहे.

विक्रमशिला महाविहार:- बिहार राज्यामध्ये असलेले विक्रमशिला महाविहाराचे खोदकामामध्ये एक पुस्तकालय, स्तूप आणि मोठा मठ सापडले आहे.

४. उत्तरप्रदेश:-

सारनाथ:- उत्तरप्रदेशातील वाराणसी मधे असलेले व वाराणसी रेल्वे स्टेशन पासून ५ किमी. दूरवर सारनाथ हे स्थळ बौद्ध धम्मामध्ये एक प्रतिक स्थळाच्या रूपात विश्व विख्यात आहे. हेच ते पवित्र स्थळ आहे, जेथे बुद्धांनी आपला प्रथम उपदेश केला होता. बोधगयात ज्ञान प्राप्तीनंतर सर्वांच्या कल्याण हेतू बुद्धांनी सर्वप्रथम आपल्या ५ जुन्या मित्रांना धम्मोपदेश केला. पहिली वेळ सांगितले की त्यांनी कल्याणकारी अरिय अष्टांगिक मारहाचा शोध लावला. या प्रथम उपदेशाला धम्मचक्र प्रवर्तन म्हटल्या जाते. भगवान बुद्धांनी सारनाथ मधेच भिक्खू संघाची स्थापना पण केली.

कुशिनगर:- ऊत्तरप्रदेशाचा हा जिल्हा बौद्धांसाठी एक महत्वपूर्ण श्रद्धास्थान आहे. हे भगवान बुद्धांचे महापरिनिर्वाण स्थळ आहे. येथेच भगवान बुद्धांनी अंतिम श्वास घेतला होता. येथे भगवान बुद्धांनी दोन शाल वृक्षांच्या मधे झोपून महापरिणीर्वान प्राप्त केले होते. येथे भगवान बुद्ध महापरिणीर्वान नावाचे विशाल स्तूप अस्तित्वात आहे. जेथे बुद्धांनी अंतिम श्वास घेतला ते स्थळ पण हजर आहे. जुने खंडर आजपण आपल्या इतिहासाची खरेपणा सांगत आहेत.

जौनपूर:- मुख्यालय पासून ५५ किमी. दूर मादरडीह गांवात, इलाहाबाद विश्वाविद्यालय मधे पुरातत्व विभाग मधे अध्यापक डॉ. अनिल कुमार दुबेच्या नेतृत्वात उत्खनन कार्य संपन्न होत आहे. सर्वेक्षण करणाऱ्या चमूला स्तूप व बुद्ध विहार असल्याचे पुरावे सापडले आहे. बुद्ध विहाराच्या भिंतीचे अवशेष पण सापडले आहे. आता पर्यंतच्या उत्खननात हे दिसून येत आहे की, जवळ जवळ २५०० वर्षांपूर्वी येथे नगरीय सभ्यता अस्तित्वात होती. संभव आहे की हे स्थान विशेषतः व्यापार, वाणिज्याचे एक महत्वपूर्ण पडावं पण राहिले आहे. उत्तरप्रदेशात बुद्धांच्या अन्य श्रद्धास्थलांमध्ये श्रावस्ती, संकीसा, कौशांबी तसेच मथुरा अन्य पण येतात.

५. मध्यप्रदेश:-

सांची:- मध्यप्रदेशात असलेले सांची बौद्ध स्मारकांसाठी विश्वप्रसिद्ध आहे. हे रायसेन जिल्ह्यात एक छोटेसे गाव आहे. स्टुपां साठी प्रसिद्ध येथे काही बौद्ध स्मारक अस्तित्वात आहेत. इसा पूर्व तिसऱ्या काळात ते बाराव्या काळाच्या दरम्यान बनलेले स्तूप, मठ, विहार आणि स्तंभांसाठी ओळखले जाते. येथे निर्मिलेले स्तूप तोरणांनी घेरले आहेत. स्तुपाच्या द्वाराच्या वरती भगवान बुद्धांचे चरित्र कोरले आहे. युनेस्कोने याला विश्व वारसा या सुचित शामिल केले आहे. सांची मधे एकूण ३६ मठ, १८ विहार, एका स्तूपाबरोबरच एक अशोकस्तंभ अस्तित्वात आहे. १८५४ इस. मधे पुरातत्विक विभागाने उत्खनन केले होते.

उज्जैन:- भगवान बुद्धांच्या अस्थी अवशेष याला संचित करून बनविलेला स्तूप २५०० वर्षांच्या जास्त प्राचीन आहे. हा स्तूप उज्जैन रेल्वे स्टेशन पासून ५ किमी. दूरवर आहे.

भरहुत स्तूप:- मध्यप्रदेशातील सतना जिल्ह्यामध्ये असलेले हे एक प्रसिद्ध बौद्ध स्थळ आहे. या स्तूपाला सम्राट अशोकाने इ. स. पूर्व तिसऱ्या काळात निर्माण केले होते. या स्तूपामध्ये बुद्धाला बौद्ध प्रतिकांच्या रूपात दर्शविले आहे. जसे बुद्धांचे पदचिन्ह, धम्मचक्र, बोधिवृक्ष इत्यादी.

ग्वालियर:- आत्ताच मध्यप्रदेशात असलेले ग्वालियर मधे शिवपुरी जिल्ह्यात राजापूर गावात जवळपास २२०० वर्षांपूर्वीचा बौद्ध स्तूप सापडला आहे. हा इसा. पूर्व शुंग वंशाच्या काळातील सांगितल्या जात आहे. ग्रामीण याला अंचलचा पहिला बौद्ध स्तूप सांगत आहेत. गावातील लोक आत्तापर्यंत या स्तूपाला कुटिया मठ नावाने ओळखत होते. पुरातत्ववाद्यांचे मानने आहे की, स्तुपाच्या खाली तांब्याचा कलश असू शकतो आणि त्यामधे सम्राट अशोक यांच्या अस्थी तसेच राख असू शकते. ग्वालियर चंबळ संभाग मधे पहिला बौद्ध स्तूप जास्त तर बपाल, विदिशा, देवास, होशंगाबादच्या जवळपासच्या क्षेत्रात सापडले आहेत.

६. ओडिसा:- हे स्थान बौद्ध धम्म संस्कृतीचे प्रमुख स्थळांपैकी एक आहे. प्राचीन बौद्ध वारशात समृद्ध ओडिसा (उडिसा) क्षतिग्रस्त बौद्ध विहार तसेच स्तूप सर्वत्र अस्तित्वात आहे. वोलंगीर, ढेनकनाल, फुलबनी, कालाहांडी, संभलपूर, क्योंझार, गंजम, वालासोर आणि पुरी अन्य जिल्ह्यांत काही महत्वपूर्ण शोध केले गेले, जेथे बुद्ध अवशेष सापडले किंवा प्रमाण मिळाले आहे. या राज्यामध्ये बौद्धधम्म स्मारकांची सर्वोत्तम निधी कटक आणि जाजपूर जिल्ह्यांत केंद्रित आहे. या परीक्षेत्रात ललितगिरी, उदयगिरी, रत्नगिरी तसेच लांगुलीमधे बुद्ध विहारे, स्तूप आणि शिळालेखांच्या रूपात बौद्ध अवशेषांची विशाल निधी आहे.

ललितगिरी:- उडिसाची राजधानी भुवनेश्वरपासून जवळजवळ ८५ किमी. दूरवर असलेले ललितगिरी हे स्थळ इ. स. च्या काळात स्थापन केल्या गेले होते. हा उडीसाचा सर्वात उत्कृष्ठ कलात्मक, प्राचीन तसेच भव्य स्थळांमधून आहे. खंडरांत झालेल्या या स्थळांचा शोध १९८५ मधे पुरातत्व विभागाद्वारे केली गेली होती. येथे उत्खननात भगवान

बुद्धांचे अस्थिधातू प्राप्त झाले होते. मुख्य स्तूपाच्या अतिरिक्त येथे ३ विशाल विहार, बहुकक्षांचे चैत्यगृहाचे अवशेष सापडले आहेत.

उदयगिरी:- सातव्या काळात येथे उडीसाचा सर्वात मोठा बौद्ध परिसर होता जो जवळजवळ ४०० ऐकरामध्ये विस्तारित होता. येथे २ विशाल विहार आहे तसेच दोन्ही एकबरोबर मिळून आपल्या काळातील सर्वात मोठी बौद्ध स्थापत्य आहे. हे स्थळ भुवनेश्वर पासून ९३ किमी. अंतरावर आहे.

रत्नगिरी:- रत्नगिरी हे स्थान बुद्ध धम्माची अन्य शाखांसारखी महायान तसेच वज्रयान परंपरेचे प्रमुख श्रद्धास्थान आहे. यामधे विहारांच्या दरवाजांवर उत्कृष्ठ नक्षी केली आहे. रत्नगिरी बौद्ध शिल्पकलेच्या दृष्टीने अत्यंत उन्नत होती, येथे भारतीय पुरातत्व सर्वेक्षणाच्या संग्रहालयामध्ये अनेक प्रकारच्या दगडांची शिल्पकला व अवशेष संरक्षित आहेत. भुवनेश्वर पासून ९१ किमी. च्या दूरवर असलेले रत्नागिरी मधे तारा, अवलोकितेश्वर, मंजुश्री आणि ध्यानी बुद्ध ही प्रतिमा मिळालेल्या आहेत.

लांगुली:- उडीसाच्या प्राचिनतम बौद्ध स्थळांच्या रूपाच्या दर्जात लांगुली स्थळाचा शोध नंतर झाला. जैपौर जिल्हा मुख्यालया पासून ६ किमी. दुरवर असलेल्या या स्थळाचा शोधाच्या नंतर हे सर्वविदित झाले की, हेनत्सांगची वैभवशाली पुष्पगिरी महाविहार आहे. हे शिक्षणाच्या महान केंद्रांमधून एक आहे.

धौली:- भुवनेश्वर पासून ८ किमी. च्या दूरवर असलेले धौली कलिंग युद्धाचे मुक साक्षी आहे ज्याने शासनप्रिय अशोकाला धम्मानुरागी मधे परिवर्तीत केले. कलिंग युद्धानंतरच बुद्ध धम्माचा गौरव संपूर्ण भारतात झाला आणि भारत विश्वगुरु होऊन अखंड बनले. जापानच्या सहयोगाने येथे एक विशाल स्तूप निर्मिला आहे.

७. हरियाणा:-

कुरुक्षेत्र:- हरियाणा राज्याची धम्मनगरी कुरुक्षेत्रच्या ऐतिहासिक बुद्ध स्तुपांचे वर्णन काही ग्रंथांमध्ये आहे. थानेसरचे शासक हर्षवर्धनच्या शासनकाळात येथे आलेले चिनी यात्रेकरू हेनत्सांगने पण कुरुभूमी मधे स्तुपांचे वर्णन केले आहे.

भारतवर्षाचे महान सम्राट अशोकद्वारे निर्मित बौद्ध स्तुपांमध्ये पुरातत्ववाद्यांचे पण एकमत आहे. वर्तमानमधे ब्रम्हा सरोवरचे प्राचीन शेरोनवाले घाटाच्या अगदी समोर पुरातत्व महत्वाचे एका स्थळावर आजपण जीर्णशीर्ण अवस्थेत एक बौद्ध स्तूप अस्तित्वात आहे. येथेच (कमळांच्या फुलांचा एक गुच्छ) अनोता झिलीवर बुद्धांनी दिक्षा दिली होती. हरियाणा मधे दुसरा स्तूप पडोसी जिल्हा यमुनानगराचा चनौतीचा स्तूप आहे. आता या स्तूपांच्या संरक्षणाचे कार्य राज्य सरकार द्वारे सुरु आहे.

८. झारखंड:-

चतरा:- इंटखोरी चतरा मधे असलेले हे बौद्ध स्तूप भद्रकाली मंदिर परिसरात आहे. बुद्ध पौर्णिमेच्या वेळी येथे बौद्ध धम्म अनुयायांची गर्दी राहत असते. मानले जाते की पहिले येथे बौद्ध स्तूप होता, ज्याला लपविण्यासाठी येथे मंदिर निर्माण केले गेले.

९. महाराष्ट्र:- महाराष्ट्र एक असा प्रदेश आहे जेथे सर्वात जास्त बौद्ध गुंफा बघितल्या जातात. खुपसाऱ्यांचा शोध आजपण सुरु आहे.

एलोरा:- ६ व्या तसेच ९ व्या काळाच्या मध्यात निर्मित गुंफा विहार कलचुरी, चालूक्य तसेच राष्ट्रकूट राजवंशाच्या शासन काळातील सोलखल्या जातो. दगडांवर नक्षिकाम करून मिर्मित गुंफा, विहार, मोठे हॉल, छोटे आवास आपल्या महान शिल्पकलेसाठी विश्व विख्यात आहे.

धम्मगिरी:- धम्मगिरी महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी मधे आहे. हे स्थळ मुंबई महानगरी पासून १३५ किमी. दूर अंतरावर आहे. एक अंतरराष्ट्रीय विपश्यना अकादमीचे मुख्यालय आहे. बुद्ध धम्माचे मोठ्या शोध केंद्रांपैकी एक येथे संपूर्ण वर्ष विपश्यना शिबिराचे आयोजन होत राहते.

ड्रॅगन पॅलेस विहार:- ड्रॅगन पॅलेस विहार हे बुद्ध विहार कामठी, नागपूर महाराष्ट्रामध्ये आहे. १४ एकर जागेत असलेल्या या विहारामध्ये एक विशाल म्युझीयम, वाताणुकुलीत सभागार, एक सामुदायिक भवन तसेच एक पुस्तकालंय आहे.

कान्हेरी गुंफा तसेच अन्य स्थळ:- कान्हेरी गुंफा मुंबईचे बोरिवलीमधे आहे. याच्या शिवाय महाराष्ट्रात दादर चैत्यभूमी, राजगढ, सातारा, पुणे, औरंगाबाद जिल्ह्यात दर्शनीय स्तूप तसेच अन्य बौद्ध अवशेष अस्तित्वात आहे.

१०. छत्तीसगढ:-

सिरपूर:- रायपूर वरून ७८ किमी. दूर महासमुंद जिल्ह्यात आहे. ६ व्या तसेच १० व्या काळात एक प्रमुख बौद्ध स्थळ होते आणि येथे चिनी यात्रेकरू हेनत्सांग ने पण भ्रमण केले होते. सन २०१३ मधे परम पावन दलाई लामा हे आल्याने या स्थळाचा गौरव पुनः स्थापित झाला. उत्खननात येथे १० बुद्ध विहार व १०००० बौद्ध भिक्षुंचे अध्ययनाचे चांगले प्रमाण प्राप्त झाले आहे. याच्या अतिरिक्त काही बौद्ध स्तूप व नागार्जुनचे येण्याचे प्रमाण पण मिळाले आहे. हे जगातील सर्वात मोठे बौद्ध स्थळ आहे. नालंदा मधे ४ बुद्ध विहार मिळाले आहे जेव्हा की येथे आतापर्यंत १० बुद्ध विहार असल्याचे पुरावे मिळाले आहेत.

११. आंध्र प्रदेश:-

अमरावती स्तूप:- गुंटूर जिल्ह्यामधे याच स्तूपापासून उपासनेची सुरुवात झाली होती. हा भारतात निर्मिलेला सर्वात मोठा स्तूप होता, सध्या याचे केवळ अवशेषच राहिले आहे. बुद्ध धम्माचे विख्यात आचार्य बुधघोष यांचा पत्ता येथेच

मिळतो. आंध्र प्रदेशात आतापर्यंत १५० बौद्ध स्थळांचे उत्खनन झाले आहे. मिळालेल्या पुराव्यांच्या आधारे सांगितल्या जाऊ शकते की, बुद्ध धम्म येथे २ रा कळ इसा पूर्व ते १४ व्या काळापर्यंत आपल्या पूर्ण वैभवात अस्तित्वात होता व संपूर्ण दक्षिण भारतात फैलला.

चंदावरम स्तूप:- चंदावरम हा दुर्लभ स्तूप आंध्र प्रदेशातील प्रकाशम जिल्ह्यातील चंद्रवरम मधे आहे. भारतातील उत्तर ते दक्षिण कांचिपुरम जाण्यासाठी एक पडाव होता, संभवतः यासाठी इथे बुद्ध विहार बनविल्या गेले होते.

विजयवाडा:- बौद्ध वारश्याला एकवटून येथे उंडवल्ली गुंफा आहे जे की, उंडवल्ली ग्रामचा हिस्सा आहे. गुंटूर जिल्ह्यातील कृष्णा नदीच्या काठावर या गुंफांना भिक्षुंच्या मठाच्या रूपात यपयोगात आणल्या जात होते.

१२. कर्नाटक:-

सनाती:- कर्नाटक मधील गुलबर्ग जिल्ह्यातील चितापूर तहसील मधे असलेले सनाती बौद्ध वास्तुशिल्पाचे उत्कृष्ठ स्थळांमधून एक आहे. भीमा नदीच्या काठावर असलेल्या सनातीला १९५४ मधे ओळखल्या गेले. १९६४ ते १९६६ या मध्यात पुरातत्व विभागाद्वारे याचे विधिवत सर्वेक्षण पूर्ण झाले. उत्खननात शिलालेख, पक्क्या मातीच्या भिंती अन्य प्राप्त झाले आहे. याच गल्लीत अस्तित्वात अनेक स्तूपांपासून येथे बुद्ध धम्म विस्ताराची पुष्टी होते.

कंगनाहल्ली:- येथे भारतीय पुरातत्व सर्वेक्षंनद्वारा केले गेलेल्या उत्खननात भीमा नदीच्या काठावर विशाल स्तूप, डाव्या तटावर एक विहार परिसर तसेच त्याच्या जवळ एक चैत्यगृह प्रकट झाले आहे.

१३. गुजरात:-

जुनागढ:- तिसऱ्या व चौथ्या शतकात निर्मित खपरा कोडीय गुंफा गुजरातच्या जुनागढ मधे स्थित आहे. जुनागढ जिल्हा अशोकाच्या काळापासूनच प्रसिध्द बौद्ध स्थळ होते. येथे अनेक बौद्ध स्तूप, मठ, प्रस्तर गुंफा व विशाल चैत्य आहे. अहमदाबाद हून जवळ १२८ किमी. दूर बनारस आणि रुपेन नदीच्या मधे असलेले एक बौद्ध पुरातात्विक स्थळ आहे, जेथे १२ सेलनुमा संरचणा आहे जे पूर्वी बौद्ध विहार राहिले असेल. चिनी यात्री वडनगरच्या आसपासच्या भागात आले होते ज्यांनी या भागाचे विस्तृत वर्णन ओन केले आहे. पुरातात्विंद्यांनी बुद्ध मूर्ती बरोबर जवळपास २००० कलाकृत्या शोधल्या, जे आता महाराजा सयाजीराव विश्वविद्यालय, वडोदराच्या पुरातत्व संग्रहालयात ठेवल्या गेल्या आहे.

१४. हिमाचल प्रदेश:-

धनकर बौद्ध मठ:- धनकर बौद्ध मठ धनकर ग्राममधे हिमाचलचे स्पिती मधे ३८९० मिटर उंचीवर स्थित आहे. स्पिती आणि पीन नदीचे संगमावर स्थित हे स्थळ दुनियात बुद्ध धम्मचे ऐतिहासिक वारश्यातील स्थान राखले आहे.

१५. काश्मीर:-

परिहासपूर:- श्रीनगर हून २६ किमीच्या दुरीवर बारामुल्ला जवळ स्थित या स्थळावर बरीच बुद्ध विहार, चैत्य व स्तूप बघितल्या गेले आहे. हारवन बौद्ध स्तूपा श्रीनगर मधे स्थित या विश्व प्रसिद्ध बौद्ध स्थळाचा शोध सर अर्ल स्टेनने केला होता. येथे चौथ्या शतकात तृतिय बुद्ध धम्म संगितीचे आयोजन झाले होते. येथे निर्मित स्तूप कुशन कळातील आहेत. या स्टुपांचे संरक्षण भारतीय पुरातत्व सर्वेक्षण करित आहे. उत्खननात प्राप्त अवशेषांना भारतीय पुरातत्व विभागाने आपल्या म्युझीयम मधे ठेवले आहे तेथेच काही अवशेष विश्व म्युझीयम मधे संरक्षित आहेत.

१६. अरुणाचल प्रदेश:-

तक्त्सांग मठ:- येथे महान बौद्धगुरु पद्मसंभवने ध्यानसाधना केली होती. या मठाची निर्मिती ८ व्या शतकात केल्या गेली होती. छोट्या पहाडाच्या वरती स्थित हे मठ हिरव्यागार वनाने घेरलेला आहे. येथील शांत निर्मळ वातावरण मनाला शांतता देते.

गोरसम चोरटेन:- तवांग कसब्यामध्ये ९० किमी दूर या क्षेत्रात सर्वात मोठा स्तूप आहे. असी मान्यता आहे की, या स्तुपाचे निर्माण १२ व्या शतकात एक लामा प्राधार द्वारा केल्या गेले होते. गल्लीगल्लीत विस्तारलेले अरुणाचल प्रदेशमधे आज अनेक मठ विद्यमान आहेत. ज्यामधे उंगेलिंग मठ, बोंडिल्ला मठ इत्यादी प्रमुख आहेत.

दो दृल चोर्टन स्तूप:- हे गंगटोकचे प्रमुख आकर्षनमध्ये एक आहे. याला सिक्कीमचा सर्वात महत्वपूर्ण स्तूप मानल्या जातो. याची स्थापना त्रूलुसी रिंपोचेने १९४५ इ. स. मधे केली होती. सिक्कीम मधे पण अनेक मठ अस्तित्वात आहे.

१७. पंजाब:-

संघोल:- फतेहगढ साहिब जिल्हयामधे स्थित एक गाव आहे जे चंडीगढ हून ४० किमी दूर आहे. येथे प्रथम शतकात निर्मिलेले बौद्ध स्तूप प्राप्त झाले आहे तसेच एक महत्वपूर्ण बौद्ध भिक्खू यांचे अस्थी अवशेष आणि बौद्ध मठपण समोर आले आहे.

१८. गोवा:-

लेमगाव गुंफा:- लेमगाव गुंफा भिक्खूंच्या द्वारे ध्यान व निवास स्थानासाठी उपयोगात आणल्या जात होते. लेमगाव शब्दाचा अर्थ आहे, लामांचा निवास. हे स्थळ उत्तरी गोवाच्या बिचोलीम शहराहून २ किमी दूर आहे.

१९. राजस्थान:-

विराट बौद्ध मठ:- जयपूर मधे स्थित या स्थळावर सम्राट अशोक स्वतः आले होते. वर्षांपर्यंत हे बुद्ध धम्माचे प्रचार प्रसाराचे केंद्र राहिले. येथे एक बौद्ध स्तूप पण आहे ज्याचा आकार सांचीच्या स्तुपाच्या कलाशिल्पाशी मिळतो.

२०. तामिळनाडू:-

कवेरीपुमपट्टीनम:- भारतीय पुरातत्व सर्वेक्षणद्वारे उत्खननात कवेरीपुमपट्टीनमचे एका मंदिरामध्ये अनेक बुद्ध मूर्ती तसेच कास्य कलाकृत्या प्राप्त झाल्यामुळे राज्यामध्ये बुद्ध धम्माच्या प्रभावाचा पत्ता मिळतो. राज्याचेच नागपट्टीनम बुद्धांच्या काळातील उन्नत भवनांचे अवशेष पण प्राप्त झाले जे विदेशी सहयोगाने निर्मिले आहेत.

ही तर केवळ सुरुवात होती, जर पूर्ण यादी बनविली गेली तर येथेच मोठा ग्रंथ बनेल, यासाठी केवळ येथे निवडक संदर्भांनांच लिहिले आहे.

भारतामधे (सम्राट अशोक काळीन भारत जो अफगाणिस्थान पासून पण पुढे पसरला होता [जंबुद्विप].) कुठेपण खोदकाम झाले तर बुध्दच बाहेर येतात, बाकी काही नाही, हे या गोष्टीचे पुरावे आहेत की, भारत बुद्धांचा देश आहे.

महान सम्राट अशोकाने प्रत्येक एक बुद्ध वचन (८४००० स्कंध) याला या प्रकारे ८४००० गुंफा, स्तूप आणि विहारांचे निर्माण केले होते.

१२०० वर्षांपासून जास्त बुद्ध शासन होते. भारताला जे सोन्याची चिमणी म्हटल्या असे होते, ते याच काळात. या बौद्ध शासनात प्रत्येक बहुजन (आज जो वेगवेगळ्या जातीत विभागला आहे.) बौद्ध होता. खऱ्या प्रकारे समता, बंधुता आणि स्वातंत्र्याचे राज्य होते. प्रत्येक व्यक्ती खुशहालीचे जीवन जगत होता.

पण नंतर नीच आणि स्वार्थी प्रवृत्तीच्या वैदिक (पुष्यमित्र शुंग [आत्ताचा राम]) आणि मुस्लिम आक्रमण कऱ्यांनी बौद्धांना कापून त्यांना जबरदस्ती त्यांचा धर्म बदलायला मजबूर करून पुढे बौद्ध संस्कृतीचा विनाश केला. खूप साऱ्या बौद्ध गुंफा, स्तूप आणि विहारे नष्ट करून गाडलीत. काहींचा आम्ही शोध करीत आहे. शोध सुरु आहे. काही बौद्ध स्थळांवर अतिक्रमण करून त्याला वेगवेगळ्या देवतेला बसवून आपली दुकाने चालू केलीत. चार धाम, तिरुपती, महालक्ष्मी, बाबरी मस्जित, राम मंदिर, पंढरपूर, कार्ला, आणि खूप सारे उदाहरण आहेत.

आज आपल्याला शाळेत शिकविल्या जाते की, इंग्रजांनी १५० वर्षे, मोगलांनी ६०० वर्षे राज्य केले पण ही गोष्ट नाही शिकविली जात की, १२०० वर्षे भारतावर (जंबुद्विप) बौद्ध राजांनी शासन केले. प्राचीन भारताच्या इतिहासात बौद्ध धम्म, तत्वज्ञान आणि बौद्ध राजांची राजनीती तसेच शासनाच्या कारणाने पाली भाषा भारताची राजभाषा होती. बौद्ध धम्म देशाचा राजधम्म होता.

इ. स. पूर्व पहिले शतकत ते १२०० शतकापर्यंत जवळपास हजारो बौद्ध गुंफा कोरल्या गेल्या. जे अफगाणिस्थानचे कंदहार पर्यंत पोहोचली आहेत. तेथे आजपण उत्खननात बुद्ध मुर्त्या सापडतात. यासाठी बौद्ध धम्म आजपण आपले अस्तित्व टिकवून आहे.

वरील संपूर्ण संशोधन प्राचीन भारत बौद्धराष्ट्र होते याचे पुरावे आहेत.

भारतात २००१ च्या जनगणनेनुसार १ कोटी बौद्ध होते. परंतु विश्वात ६०० कोटी जनसंख्यात १५० कोटी बौद्ध आहेत. ही काही छोटी गोष्ट नाही. ही जनसंख्या तलवार दाखवून किंवा लालच देऊन झाली नाही तर तत्वज्ञान व मानवतावादी विचारांनी निर्माण झाली. याचे श्रेय त्या भारतीय बौद्ध राजांना जाते, ज्यांनी बौद्धधम्माला राजाश्रय देऊन त्याचा प्रचार प्रसार संपूर्ण विश्वात केला.

बौद्धधम्माचे २५०० वर्षांच्या इतिहासात बिंबिसार, प्रसेंजित, अजातशत्रू, अशोक, कनिष्क, मिलिंद, सातवाहन राजे, वाकाटक, हर्षवर्धन सारखे सम्राट आणि त्यांच्या नंतर पाल जसे छोट्या मोठ्या राजांनी पण बुद्धधम्माला राजाश्रय दिला. याच कारणाने इ. स. १२ वे शतक पर्यंत भारतामध्ये तक्षशिला, विक्रमशीला, नालंदा, वल्लभी, उदंतपुरी जसे बौद्ध तत्वज्ञानाचे प्रचार करणारे वैश्विक दर्जाचे १९ विश्वविद्यालय यांचे निर्माण झाले. अज्ञानाच्या अंधकारात डुबलेल्या विश्वाला ज्ञान, विज्ञान, तत्वज्ञान शिकवून बाहेर काढण्याचे महान कार्य या विश्वविद्यालयांनी केले.

भारत जेव्हा बौद्धमय होता तेव्हा खरेपणाने महासत्ता होता. स्त्रियांना माणसन्मान होता, सर्वांना न्याय मिळत होता, जागतिक व्यापारामध्ये भारताचे ३०% हून जास्त हिस्सा होता. हाच तो काळ आहे जेव्हा भारत सोन्याची चिमणी होता. भारत विश्वाचा केंद्रबिंदू होता. आजपण भारताला विश्वात *"बुद्धाची भूमी"* म्हटल्या जाते.

एका पाश्चिमात्य पुरातत्व अभ्यासकाने सांगितले आहे की, ज्या समाजाचा इतिहास भूमीच्या गर्भात मिळतो तोच समाज त्या भूमीचा हक्कदार असतो.

पण सत्य सत्य असते. ते समोर येत आहे आणि येत राहणार...

संकलन: कॉपी पेस्ट.

☸️ ☸️ 🔵 🔵 🔵 जेष्ठ पौर्णिमेचे विशेष महत्व 🔵 🔵 🔵 ☸️ ☸️

प्रत्येक पौर्णिमा तथागत बुद्धांच्या कोणत्या न कोणत्या जीवन घटनेशी रेखांकित करते.

जेष्ठ पौर्णिमेच्या दिवसी चक्रवर्ती राजा सम्राट अशोक महानने आपले पुत्र महेंद्र व पुत्री संघमित्राला पांच भिक्खूं इत्थिया, उत्तिया, संबला, भद्दसला आणि सामनेर सुमना सोबत बोधिवृक्षाची शाखा घेऊन श्रीलंकेत पाठविले होते.

याच दिवसी तेथील राजा देवानंप्रिय तिस्सला भेटले आणि श्रीलंकेमध्ये अनुराधपूरम शहरामध्ये एक शाखा लावून बुद्ध धम्माची सुरुवात केली होती आणि श्रीलंकेत भिक्खूणी संघाची स्थापना पण केली होती.

☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 🐙 तथागत बुद्धांचा वास्तविक इतिहास समोर आणल्या कारणाने ब्राम्हणांनी इंग्रजांच्या विरोधात आजादीचे आंदोलन चालविले! 🐙 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️

"भारत देशात इंग्रज आले आणि त्यांनी येथील लोकांवर खूप अत्याचार केले?" हाच इतिहास आतापर्यंत आपल्याला शिकविला गेला, परंतु खरा इतिहास आणखी काहीच आहे. इंग्रजांनी भारतात जेव्हा पहिले पाऊल ठेवले, तेव्हा भारत देशात मुगल आणि पेशव्यांचा राज्य होते. मराठेशाही बिलकुल पण नव्हती. सन १८१८ मधे पेशवा ब्राम्हण लोकांना परास्त करून इंग्रजांनी आपल्या शासनाची पाया ठेवला, इतिहासात या लढाईला भीमा कोरेगावची लढाई म्हटल्या जाते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या शासनकाळात जो सम्मान अन्य मागास वर्गाला दिला जात होता, तो सम्मान पेशव्यांनी हिसकावून त्यांना शूद्र घोषित करून दंडित करण्याचे काम केले होते. यासाठी सर्व जाती धर्माचे भीमा कोरेगावच्या लढाईमध्ये पेशव्यांविरोधात युद्धात शामिल झाले होते. इंग्रजी शासनकाळात इंग्रजांनी भारतात कितीतरी सुविधा विकसित केल्या होत्या, त्यांनी येथे छोटे मोठे उद्योग पण सुरु केले होते. परंतु इंग्रजांनी जेव्हा भारताचा मूळ इतिहास शोधण्याचा प्रयत्न केला, तेव्हा ब्राम्हण लोकांनी त्यांच्या विरोधात आजादीचे आंदोलन सुरु केले. आजादीच्या आंदोलनामध्ये भारतीय लोकांचा उपयोग केला गेला. आजादीच्या आंदोलनापूर्वी इंग्रजांनी भारतीयांवर अत्याचार केले होते? याचे आजपर्यंत काही साक्ष प्रमाण मिळाले नाही आणि नाही काही असा इतिहास कुणी लिहून ठेवला आहे.

राष्ट्रपिता ज्योतीरावं फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वेळेत भारत देश हा इंग्रजांचा गुलाम देश होता, पण भारतात काही लोक असे पण होते, ज्यांना येथील ब्राम्हणवादी व्यवस्थेने गुलाम बनवून ठेवले होते. ब्राम्हणवादी व्यवस्थेच्या विरोधात आजादीची लढाई क्रांतिज्योती राष्ट्रपिता महात्मा ज्योतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे महान लोक लढत होते. त्याकाळी इंग्रज लोक अत्यंत शांतीपूर्वक तऱ्हेने भारतावर राज्य करित होते, परंतु त्यांना भडकविण्याचे काम ब्राम्हण पंडित लोकांनी केले, आणि तेथून युद्ध छेडल्या गेले. अर्थ स्पष्ट आहे की, इंग्रजांना भडकविण्याची सर्वात अधिक अहं भूमिका जर कुणी निभाविली असेल? तर ती केवळ ब्राम्हण लोकांनी. राष्ट्रपिता महात्मा ज्योतीराव फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी इंग्रज शासन काळात येथील भारतीय लोकांच्या आजादीसाठी आंदोलन चालविले. कारण जसा भारत देश इंग्रजांचा गुलाम होता, तसेच भारतातील लोक ब्राम्हण लोकांचे गुलाम होते. ही गोष्ट ते जाणत होते, यासाठी त्यांनी शूद्र, अतिशूद्र, मागास, अतिमागास वर्गातील लोकांच्या आजादीला महत्व पूर्ण मानले. इंग्रजांना शूद्र तसेच अतिशूद्र लोकांबद्दल नेहमी सहानुभूती असे. कारण इंग्रज लोक यांचा मूळ इतिहास चांगल्या प्रकारे जाणत होते.

सन १९२८ मधे इंग्रजांचनेक विभाग भारतात आला होता, ज्याला सायमन कमिशन म्हटल्या जाते. सायमन कमिशन हा मागास, अतिमगास वर्गांची जाती आधारित गणना करण्यासाठी भारतात आला होता. परंतु ब्राम्हण लोकांनी सायमन कमिशन बद्दल वेगवेगळ्या अफ़वा फैलवून त्यांना सायमन कमिशन परत जा चा नारा देऊन परत

जाण्यासाठी मजबूर केले. तेव्हापासून आत्ता पर्यंत पत्ता नाही लागला की, भारतातील एससी, एसटी, ओबीसी या लोकांची मूळ संख्या किती आहे? ब्राम्हण लोकांनी इंग्रजांच्या विरोधात आजादीचे आंदोलन का चालविले? या विषयावर आत्तापर्यंत खूप साऱ्या इतिहासकारांनी लिहिले आहे. परंतु बुद्धिस्ट इंटरन्याशनलं नेटवर्कच्या आमच्यासारख्या इतिहासकारांचे असे म्हणणे आहे की, "तथागत बुद्धांचा वास्तविक इतिहास दुनियेसमोर आणण्याच्या कारणाने ब्राम्हण लोकांनी इंग्रजांच्या विरोधात आजादीचे आंदोलन चालविले." भारत देशात बुद्धगया, सारनाथ, काशी, मथुरा पासून महाराष्ट्रातील अजिंठा, एलिफंटा पर्यंत जेवढे पण प्राचीन बौद्ध स्थळांची माहिती मिळाली आहे. त्याला शोधण्याचे तसेच त्याचा वास्तविक इतिहास समोर आणण्यासाठी जेम्स प्रिन्सेप तसेच सर अलेक्सझांडर कनिंघम अस्या लोकांचे महत्वपूर्ण योगदान राहिले आहे. आज त्यांच्यामुळेच आपण तथागत बुद्धांचा हरपून गेलेला इतिहास पुन्हा वाचत आहोत. तसेच तो इतिहास जाणून घेत आहोत.

तथागत बुद्धांचा इतिहास समोर आणणाऱ्या व्यक्तींमध्ये सर अलेक्सझांडर कनिंघम यांचे नाव सर्वश्रेष्ठ इतिहासकारांमध्ये येते. सर अलेक्सझांडर कनिंघम यांचा जन्म २३ जानेवारी १८१४ मधे झाला. त्यांनी १९ वर्षांच्या वयात इंग्रज सरकारमध्ये काम करायला सुरु केले, जेव्हा ते भारतात आले, तेव्हा ते सर जेम्स प्रिन्सेप च्या सारखे बिलकुल एक लहान मुलगा होते. त्यांनी २१ वर्षाच्या वयात सारनाथचे उत्खननं सुरु केले होते. म्हटल्या जाते की, सारनाथच्या उत्खनन सर अलेक्सझांडर कनिंघम यांनी स्वतःच्या खर्चाने केले होते. यातून त्यांची महाणता स्पष्ट होते. आज भारतात जो भारतीय पुरातत्व विभाग आहे, या विभागाची स्थापना कणारे मूळ संस्थापक तसेच त्याचे जनक सर अलेक्सझांडर कनिंघम आहे. प्राचीन स्थळांची निष्पक्ष होऊन पडताळणी करून आणि वास्तविक इतिहास दुनियेसमोर आणायला पाहिजे, ही बाब पुरातत्व विभागातील लोकांनी त्यांच्याकडून शिकायला पाहिजे. अलेक्सझांडर कनिंघम यांनी काशी, मथुरा, बौद्धगया, संकीसा, सांची आणखी काही सारे प्राचीन स्थळांचे उत्खनन केले होते. तेव्हा त्यांना एक गोष्ट माहित झाली की, या सर्व प्राचीन स्थळांचा संबंध केवळ एका व्यक्तीशी आहे. आणि ती व्यक्ती म्हणजे, तथागत भगवान गौतम बुद्ध! सर अलेक्सझांडर कनिंघम यांनी जेथेपण भात दिली, जेथेपण पाऊल ठेवले, त्यांना केवळ तथागत बुद्धच मिळाले. २३ जानेवारी ही सर अलेक्सझांडर कनिंघम यांची जयंती दिवस आहे. या उपलक्षावर आम्ही संपूर्ण भारतीय लोकांना त्यांच्या जयंतीची मंगलमय मैत्रीपूर्ण शुभेच्छा देतो आणि शेवटी केवळ एवढेच सांगतो की, तथागत बुद्धांचा मूळ इतिहास विश्वासमोर आणल्या कारणानेच ब्राम्हण लोकांनी इंग्रजांच्या विरोधात आजादीचे आंदोलन सुरु केले होते. हाच भारताचा खरा इतिहास आहे.

संकलन: शालिनी आंबेडकर.

☸️☸️🦚🦚🦚 आदर्श पिता रामजीबाबा आंबेडकर यांचा आज २ फेब्रुवारी १९१३ स्मृतिदिन 🦚🦚🦚☸️☸️

रामजी बाबा वयाच्या १८ व्या वर्षी ईस्ट इंडिया कंपनीच्या १०६ च्या सॅपर्स अँड मायनर्स विभागात भरती झाले. रामजीबाबांचे लष्करातील कसब पाहून त्यांना सेव्हन पायोनियर बटालीयनमध्ये बढती देण्यात आली. रामजीबाबा हे लष्करात नोकरी करीत असले तरी ते फार कुटुंबवत्सल्य, धर्मभोळे आणि शिस्तप्रिय स्वभावाचे होते. त्यांच्यावर कबीर पंथाचा प्रभाव होता. ठाणे जिल्ह्यातील मुरबाडमधील आंबेटेंबें गावात स्थायिक असलेल्या लष्करातील सुभेदार रामजी मेजर धर्माजी मुरबाडकर यांच्या द्वितीय कन्या भीमाबाई यांच्यासोबत रामजीबाबांचा विवाह झाला. त्यानंतर त्यांना एकूण चौदा (१४) अपत्ये झाली. त्यापैकी १४ एप्रिल १८९१ रोजी जन्माला आलेले भीमराव हे चौदावे रत्न.

रामजीबाबांची प्रखर बुद्धिमत्ता आणि खेळातील प्राविण्य पाहून कंपनी सरकारमधील एका इंग्रज अधिकाऱ्याने त्यांना पुण्यातील नॉर्मल स्कूलमध्ये प्रवेश मिळवून दिला. येथे रामजीबाबांनी डी. एड. चे शिक्षण घेतले आणि लष्कराच्या छावणीत शिक्षक आणि कालांतराने मुख्याध्यापक म्हणून १४ वर्षे नोकरी केली. रामजीबाबांचे कर्तुत्व पाहून ईस्ट इंडिया कंपनीने त्यांना 'सुभेदार मेजर' हि पदवी बहाल केली.

विवाह झाल्यानंतर रामजीबाबांनि आणि भिमाईने अनेक गंभीर प्रसंगांना तोंड दिले; मात्र त्यांनी एकमेकांना डगमगू दिले नाही. त्यांनी आपल्या पोटची ७ मुले गमावली. तर बाळाराम, गंगा, तुळसा, आनंदराव, मंजुळा, रमाबाई, भीमराव यांचा सांभाळ करतांना खूप कष्ट सोसले. कुटुंबातील आर्थिक चढ-उतार, मुलाबाळांचे संगोपन, भिमाईंचा मस्तकशुळाचा आजार आणि वारंवार होणाऱ्या बदल्यांमुळे रामजीबाबांची कमालीची ओढाताण होत असे, परंतु ते प्रत्येक परिस्थितीला धैर्याने सामोरे गेले.

त्यानंतर काही काळातच इ. स. १८९४ मधे रामजीबाबा ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनीच्या लष्करी सेवेतून निवृत्त झाले. दरमहा त्यांना ५० रु. पेन्शन मिळत असे. मात्र तुटपुंज्या पेन्शनमध्ये त्यांच्या कुटुंबाच्या प्राथमिक गर्जाही भागत नव्हत्या. त्यामुळे रामजीबाबांनी सातारा येथील पी. डब्ल्यू. डी. च्या कचेरीत स्टोअरकिपरची नौकरी सुरु केली. नौकरीकरिता ते सहकुटुंब सातारा येथे स्थाईक झाले. येथे सातारा कॅम्प स्कुलमधे भीमराव आणि आनंद यांनी आपल्या शैक्षणिक आयुष्यायची सुरुवात केली.

भिवाचे प्राथमिक शिक्षण सुरु असतांनाच रामजीबाबांची नौकरी गेली. पी. डब्ल्यू. डी. च्या कचेरीतील काम संपल्याने रामजी बाबांना आता कुटुंबाच्या उदरनिर्वाहाकरिता आपले बस्थान हलविणे अनिवार्य झाले. मुलांचे संगोपन आणि शिक्षण याकरिता रामजीबाबांनी थेट मुंबई गाठली. मुंबईत आल्यानंतर रामजीबाबांनी सर्वप्रथम आनंदराव आणि भीमराव यांना परळच्या एल्फिन्स्टण विद्यालयात प्रवेश घेतला, परंतु तुटपुंज्या पेन्शनवर भगत नसल्यामुळे त्यांनी तेथेही नौकरीचे प्रयत्न सुरु केले. आपल्या कुटुंबाच्या हलाखीच्या परिस्थितीला हातभार लावता यावा याकरिता भीमरावांचे वडिलबंधू आनंदराव यांनीही आपल्या शालेय शिक्षणाला पूर्णविराम देत कंपनीमध्ये

नौकरी केली. १८९६ मधे भीमाईचे निधन झाले. भीमाईच्या निधानाने रामजीबाबा हताश झाले. परंतु त्यातूनही त्यांनी स्वतःला आपल्या कुटुंबाला सावरले. टेबपुन्हा जोमाने उभे राहिले आणि आपल्या ध्येय्याकडे वाटचाल करू लागले.

रामजीबाबांनी आपल्या मुलांच्या उज्ज्वल भवितव्याकरिता त्याला उच्चशिक्षित करण्याचे ध्येय्य शेवटपर्यंत सोडले नाही. भिवा मॅट्रिक उत्तीर्ण व्हावा आणि तेही चांगल्या गुणांनी याकरिता रामजीबाबांनी ज्या हालअपेष्ठा सहन केल्या त्या शब्दात व्यक्त करण्यापलीकडच्या आहेत. स्वतः रात्र रात्र जागून त्यांनी भिवाच्या मनात वाचनाची, अभ्यासाची, लेखनाची अवीट गोडी निर्माण केली. त्याच्या शिक्षणात खंड पडू दिला नाही. तुटपुंज्या पगारात कुटुंबाचा गाडा ओढणे अशयक्य होते, परंतु रामजीबाबांनी कधीही हार मानली नाही. त्यांनी प्रत्येक वेळा स्वतःच्या जीवाचे रान करून भीमरावाची प्रत्येक शैक्षणिक गरज भागविली.

२३ जानेवारी १९१३ ला भीमरावांची बडोदा सरकारच्या सैन्यात लेफ्टनंट नेमणूक करण्यात आली. सदर नौकरीवर रुजू झाल्यानंतर काही दिवसातच रामजीबाबांची प्रकृती खालवल्याची तार भीमरावांना मिळाली आणि ते तसेच बडोद्यावरून मुंबईला पोहोचले. रामजीबाबा आणि बाबासाहेबांची ती अखेरची भेट ठरली. २ फेब्रुवारी १९१३ रोजी रामजीबाबांचे निर्वाण झाले.

जाहला कुल उद्धार!

पितामह सुभेदार रामजी मालोजी आंबेडकर!

तीन पिढ्यांच्या पुण्याईने, जाहला कुल उद्धार.

ज्ञान दीप हा सुसंस्कारीला... सूर्य दिनांचा शिल्पकारिला... दिव्य ज्ञानही जीवनी लाभे, पाजिले क्षीर सागर...

जाई समोरी आर्त दुःखाला... काही सर्वस्व सार्थ कार्याला भीम कर्तव्य सदैव जागे, साधले सुखी संसार...

स्मरू आदर्श पितृ कृतीला करू वंदन पुण्य स्मृतीला....

आदर्श पिता रामजीबाबा यांना कोटी कोटी प्रणाम...! त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन!!

संकलन: सविता राजेंद्र बाविस्कर.

☸ ☸ 🦚 🦚 🦚 *आदर्शपिता रामजी मालोजी सकपाळ (आंबेडकर) स्मृतीदिना निमित्ताने विनम्र अभिवादन* 🦚 🦚 🦚 ☸ ☸ 💐 *************************

जन्मः- १४ नोव्हेंबर १८३८. सुभेदार रामजी सकपाळ (आंबेडकर) यांचा जन्मदिन

****

जन्मः- १४ नोव्हेंबर १८३८ *मृत्यू:- २ फेब्रुवारी १९१३ (मुंबई)*

सुभेदार मेजर रामजी आंबेडकर यांचा आज १८५ वा जन्मदिन. ते एक महान योद्धा होते. त्यांनी अफगाणिस्तानच्या युद्धात प्रत्यक्ष लढाई केलेली होती. त्यांच्यातील कुशल शिक्षकाचे गुण ओळखून ब्रिटीश सरकारने त्यांना पुण्याला पाठवून टिचर्स ट्रेनिंग दिले. त्याकाळात त्यांचा महात्मा जोतीराव फुले व सावित्रीबाई यांच्याशी परिचय झाला. पुढे त्याचे रूपांतर घनिष्ट मैत्रीत झाले.

शूद्र अतिशूद्रांमधून कोणी तरी महापुरूष जन्माला येईल आणि तो या घटकांची गुलामी संपवील असे फुले म्हणत असत. तसे त्यांनी आपल्या पुस्तकात भाकीतही वर्तवलेले आहे. आपल्या १४ व्या अपत्याकडे, भीमाकडे, सुभेदार रामजी त्यादृष्टीने पाहात असत. त्यांना प्रथम पत्नी भीमाबाई पासून झालेल्या १४ मुलांमधली अवघी ६ जगली. बाळाराम, गंगा, तुळसा, मंजुळा, आनंद आणि शेंडेफळ भीमराव.

रामजी इंदूरजवळच्या लष्कराच्या छावणीत शिक्षक होते. पुढे ते मुख्याध्यापक झाले. याच 'मिल्ट्री हेडक्वार्टर ऑफ वॉर' म्हणजेच MHOW महू मध्ये भिमरावांचा १४ एप्रिल १८९१ ला जन्म झाला. भिवा ३ वर्षांचा असताना ते लष्करातून निवृत्त झाले. काही काळ दापोलीला राहिल्यावर नोकरीच्या शोधात ते साताऱ्याला गेले. भिवाचे प्राथमिक शिक्षण साताऱ्यातच झाले.

रामजी हे रामानंदी पंथाचे असल्याने त्यांच्यावर संत कबीर, संत तुकाराम आणि अन्य संतांच्या विचारांचा खोलवरचा प्रभाव होता. "आपले वडील गुणी शिक्षक होते. त्यांनी बालपणी आपल्यावर उत्तम संस्कार केले. धार्मिक बाबतीत ते रोमन हुकुमशहासारखे वागत असत" असे बाबासाहेबांनी आपल्या शेवटच्या पुस्तकाच्या (बुद्ध आणि त्यांचा धम्म) प्रस्तावनेत नमूद केलेले आहे. १४ ऑक्टोबर १९५६ ला स्वतः बौद्ध धम्माची दिक्षा घेतांना व लक्षावधी बांधवांना दिक्षा देतांना बाबासाहेबांनी नागपूरच्या दीक्षाभूमीवर सर्वप्रथम सुंभेदार रामजींना आदरांजली आदरांजली अर्पण केलेली होती.

त्यांनी आपल्या मुलींना घरीच ईतके उत्तम शिक्षण दिलेले होते. त्या सगळ्याजणी ग्रंथवाचन करीत आणि प्रसंगी धर्मग्रंथावर उत्तम प्रवचनही देत असत असेही बाबासाहेबांनी नमूद केलेले आहे.

सांगितप्रेमी बाळाराम फारसे शिकले नसले तरी त्यांचे इंग्रजीवर प्रभुत्व होते. आनंदरावला कुटुंबाला आर्थिक हातभार लावण्यासाठी शिक्षण अर्धवट सोडून नौकरी धरावी लागली. भीमरावला मात्र खूप शिकवायचे अशी रामजीबाबांची महत्वाकांक्षा होती. भिवा १९०७ साली मॅट्रिक झाल्यानंतर त्याला त्यांनी पुढे २ वर्षे महाविद्यालयीन शिक्षण दिले.

*आपल्या तुटपुंज्या पेन्शनमधून भागत नसतांनाही त्यांनी त्यासाठी खूप हालापेष्टा भोगल्या. भीमारावाला दर्जेदार शिक्षण मिळावे म्हणून रामजी दापोली आणि सातारा येथे काही वर्षे काढल्यानंतर मुंबईला आले. चाळीच्या एका

खोलीत भिवाचा अभ्यास होत नसल्याने स्वतः रामजीबाबा रात्री २ वाजेपर्यंत जागे रहायचे. २ वाजता भिवाला झोपेतून उठवून अभ्यासाला बसवायचे आणि मगच झोपायचे. पुन्हा दिवसभर ते नानाविध नौकऱ्या किंवा अन्य काबाडकष्ट करायचे.*

केवळ भिवाच्या अभ्यासासाठी परवडत नसतानाही त्यांनी चाळीतली समोरची खोली घेतली. भिवामधे त्यांनी अभ्यासाची व वाचनाची आवड निर्माण केली. भिवाने मागितलेले प्रत्येक पुस्तक ते त्याला आणून देत असत. स्वताजवळ पैसे नसले तर आपल्या वैवाहित मुलींकडून त्यांचे दागिने उसने आणून ते गहान ठेवून त्यावर ते कर्ज काढीत पण पुस्तक आणून देत.

प्रख्यात सत्यशोधक लेखक कृष्णाजी अर्जुन केळूसकर आणि दा. सा. यंदे यांच्या प्रयत्नातून भीमरावाला सयाजीराव गायकवाड यांची स्कॉलरशिप मिळाली आणि ते पदवीधर झाले. शिश्यवृत्तीच्या अटी आणि शर्तींनुसार बडोद्यात काही वर्षे नौकरी करणे आवश्यक होते.

त्यानुसार भीमराव नौकरीवर जायला निघाले तेव्हा रामजींनी त्यांना बडोद्याला जायला विरोध केला. सनातण्यांच्या गुजरातेत भिषण जातीयता असल्याने आपल्या मुलाचा छळ होईल अशी साधार भीती त्यांना वाटत होती. ती पुढे खरीही ठरली. बडोद्यात भीमरावांना अनेक संकटांना सामोरे जावे लागले. त्यांना राहायला घरही मिळाले नाही. कार्यालयातही त्यांचा पदोपदी अपमान करण्यात आला.

भीमरावांनी बडोद्याला जाण्यासाठी घर सोडले त्याच दिवसी मुलाच्या काळजीने हा योद्धा पुरुष आजारी पडला आणि पंधरवाड्याभरात त्यांचे २ फेब्रुवारी १९१३ ला दुःखद निधन झाले.

वडील आजारी असल्याची तार मिळताच भीमरावं मुंबईला यायला निघाले. वडिलांची आवडती मिठाई घेण्यासाठी ते सुरत रेल्वे स्टेशनवर उतरले आणि त्यांची ट्रेन सुटली. पुन्हा गाडी २४ तसांनी होती. भीमराव घरी पोहोचले तेव्हा माझा भिवा आला म्हणून रामजींनी दोन आनंदाश्रू ढाळले आणि त्यांचे तात्काळ निधन झाले. जाणू फक्त भिवाला पाहायला, भेटायलाच ते थांबले होते.

"असे होते रामजी म्हणून घडले ग्रंथप्रेमी भीमजी." हे आपण कदीही विसरता कामा नये.

संकलन: प्रा. हरी नरके.

☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 *बुद्ध प्रतिमा असलेली पोष्टाची तिकीटे* Buddha Image Postal Stamps 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️

भगवान बुद्धांची मौल्यवान शिकवणुक आणि तिचे अपूर्व स्वरूप सर्व भारतीय धार्मिक विचारधारांच्या अध्ययनात दिसून येते. सदाचारास प्रवृत्त करण्यासाठी मानसिक संस्काराचे महत्त्व त्यांच्या उपदेशात

आढळते. म्हणूनच बुद्धांचे अध्यात्मिक तत्त्वज्ञान ही फार मोठी सामर्थ्यशाली देणगी जगाला मिळाल्याचे दिसते. जगात सर्वत्र बुद्ध तत्त्वज्ञान झपाट्याने पसरत असून अनेक देशात त्यांच्याप्रती आदरयुक्त भाव प्रगट होत आहे. अनेक देशांनी बुद्धांच्या या थोर व्यक्तीमत्त्वाबाबत आदर व्यक्त करण्यासाठी, नमन करण्यासाठी टपाल तिकिटे प्रसिद्ध केली आहेत.

१९५६ साली २५०० वी बुद्धजयंती सर्व जगभर साजरी करण्यात आली. त्यानिमित्ताने अनेक देशांनी टपाल तिकिटे प्रसिद्ध केली. सन २०१४ मध्ये भूतान देशाने बुद्धांच्या जीवनक्रमातील ठळक घटनांची १२ टपाल तिकिटे प्रसिद्ध केली आहेत. ती आज महत्त्वाची मानली जातात. या टपाल तिकीटांमधून भगवान बुद्ध यांच्या जन्मापासून ते महापरिनिर्वाण पर्यंतचा जीवनप्रवास उलगडलेला दिसून येतो. सिरीलंका ने २०१७ मध्ये संयुक्त राष्ट्र परिषदेत साजऱ्या होणाऱ्या वैशाख पौर्णिमेच्या निमित्ताने २० देशातील पूजनीय बौद्ध स्थळांची टपाल तिकिटे प्रसिद्ध केली.

अनेक देशात बुद्ध जयंतीच्या निमित्ताने टपाल तिकिटे प्रसिद्ध होत असतात. तरी बुद्ध प्रतिमा असलेल्या टपाल तिकिटांचे फोटो वाचकांच्या माहितीसाठी आणि अभ्यासासाठी येथे देत आहे. अशा या बुद्धप्रतिमांच्या टपाल तिकिटांवर मोठा निबंध-प्रबंध लिहिला जाऊ शकतो. कारण प्रत्येक देशाचे टपाल तिकीट हे त्या देशाचा इतिहास सांगत असते.


HELGÖ
SVERIGE BREV
S.H./M.M. STATYETT P.NASZARKOWSKI sc. 2015



AFS 40 AFGHAN POST 2003
Monumental Buddha Head
GANDHARA

大日本帝國郵便
壹圓
1 EN


25
KELANIYA TEMPLE PAINTING
ශ්‍රී ලංකා இலங்கை
SRI LANKA

1·00
KELANIYA TEMPLE PAINTING
ශ්‍රී ලංකා இலங்கை
SRI LANKA

TEM PHÁT HÀNH CHUNG VIỆT NAM - ẤN ĐỘ
Tháp Sanchi (Ấn Độ)
VIỆT NAM
BƯU CHÍNH 3000đ
Brahm Prakash 2018
2-1

नेपाल हुलाक टिकट
75 P.
पै. ७५
बुद्धजयन्ती
NEPAL POSTAGE

POSTE LAO
3300K
Buddha image at Phiawat temple(Xiengkhuang)

대한민국 KOREA 1997 170
세계유산등록
석굴암 본존불


1977
대한민국우표
REPUBLIC OF KOREA
20



الجمهورية العربية اليمنية
FAMOUS ART OF SIAM
YEMEN ARAB REPUBLIC
4 B
AIR MAIL


ประเทศไทย THAILAND
6 บาท BAHT
POSTAGE
สมโภชพุทธมณฑล
BUDDHA MONTHON CELEBRATIONS
1988


CAMBODGE
3
POSTES
PREAH KO


5.00
भारत
INDIA
Phố Minh Pagoda (Viet Nam)
2018
फो मिन्ह पगोडा (वियतनाम)


ROYAUME DU CAMBODGE
POSTES 1996
APSARA
GROUPE DE PRASAT TONLE BATI
50R


10500đ
TEM PHÁT HÀNH CHUNG VIỆT NAM - ẤN ĐỘ
BƯU CHÍNH
Chùa Phổ Minh (Việt Nam)
VIỆT NAM
Du, Tuấn 2018
2-2


10 CH
BHUTAN
stampscoinsnotes.com


ශ්‍රී ලංකා
இலங்கை
SRI LANKA
THUPARAMA


भारत
INDIA
5.00
बुद्ध
BUDDHA
2007


Sanchi Stupa
2500
2018
साँची स्तूप
भारत
INDIA


MONGOLI


3K
POSTES
ROYAUME DU LAOS
2500ème ANNÉE DE LA NAISSANCE DU BOUDDHA
MARC LEGUAY
PHEULPIN. SC


Г. Занабазар
20
MONGOLIA
МОНГОЛ ШУУДАН


বাংলাদেশ
BANGLADESH
DHARMARAJIKA MAHA VIHARA, DHAKA
বুদ্ধমূর্তি, ধর্মরাজিক মহাবিহার, কমলাপুর, ঢাকা
৳১০
BUDDHA STATUE
৳10


中国邮政
20分
CHINA
1993－13 唐 奉先寺卢舍那大佛 (4－1)T



2500
BUDDHIST ERA
SHWEDAGON
UNION OF BURMA
POSTAGE


NIPPON
日本郵便
50


ประเทศไทย THAILAND
2 บาท
BAHT


Dzey Pa Chu Nyi (The 12 Deeds of Lord Buddha)
00670


150,-
KELESTARIAN
WARISAN BUDAYA
TERLETAK
DITANGANMU
1983
REPUBLIK INDONESIA











☸️ ☸️ 🦚 🦚 🦚 🌷 बुद्ध आणि त्यांचा धम्म 🌷 🦚 🦚 🦚 ☸️ ☸️

प्रथम खंड

सिद्धार्थ गौतम बोधिसत्व बुद्ध कसे झाले?

भाग पहिला

जन्मापासून परिवज्ज्ये पर्यंत

(१) कुळ

****

ख्रिस्त पूर्व सहाव्या शतकात उत्तर भारतात सार्वभौम असे एक राज्य नव्हते. सबंध देश निरनिराळ्या अनेक लहान मोठ्या राज्यात विभागला गेला होता. त्यापैकी काही राज्यांवर एका राजाची सत्ता होती, तर काहींवर एका राजाची सत्ता नव्हती.

राजाची सत्ता असलेली राज्ये संख्येने एकूण सोळा होती. त्यांची नावे अंग, मगध, काशी, कोशल, वज्जी, मल्ल, चेदी, वत्स, कुरू, पांचाळ, मत्स्य, सौरसेन, अश्मक, अवंती, गांधार आणि कम्बोज ही आहे.

या राज्यांवर राजाची अधिसत्ता नव्हती; ती ही होत कपिलवस्तूचे शाक्य, पावा व कुशी नारा येथील मल्ल, वैशालीचे लिच्छवी, मिथिलीचे विदेह, राम ग्रामचे कोलीय, अल्लकप्पचे बळी, रेसपुत्तचे कलिंग, पिप्पलवनाचे मौर्य आणि ज्याची राजधानी सुंसुमारगिरी होती ते भग्ग.

ज्या राज्यांवर राजाची सत्ता होती त्या राज्यांना जनपद मदत व ज्यावर राजाची सत्ता नव्हती त्या राज्यांना संघ किंवा गणराज्य असे म्हणत असत.

कपिलवस्तू येथील शाक्यांच्या शासन पद्धती विषयी विशेष अशी माहिती मिळत नाही या राज्याची शासन व्यवस्था प्रजासत्ताक होती की त्यावर काही विशिष्ट लोकांची सत्ता होती हे समजत नाही.

तथापि हे मात्र निश्चित की त्यांच्या गणतंत्र राज्यात अनेक राजवंश होते व ते आळीपाळीने राज्यसत्ता चालवित होते.

अशा प्रकारे राजसत्ता या राजघराण्याच्या प्रमुखाला राजा अशी संज्ञा होती.

सिद्धार्थ गौतमाच्या जन्माच्या वेळी राजपद धारण करण्याची पाळी शुद्धोदनाची होती.

शाक्यांचे राज्य भारत व

१८९४०५६७२३